# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## ...तर आम्ही तुम्हाला जनतेसमोर उघडे पाडू; सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारला सुनावले

नवी दिल्ली दि.११ (वृत्तसंस्था)- सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारवर तीव्र नाराजी व्यक्त करत, तुम्हाला जनतेसमोर उघडे पाडू असा कठोर इशारा दिला आहे. न्यायालयाने म्हटले की, राज्य सरकार जामीन अर्जांना जोरदार विरोध करते, मात्र फौजदारी खटल्यांची सुनावणी जलदगतीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलत नाही. न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्लाह आणि न्यायमूर्ती शील नागू यांच्या खंडपीठासमोर एका परदेशी नागरिकाच्या जामीन अर्जावर सुनावणी सुरू होती. त्यावेळी न्यायालयाने हे विधान केले आहे.

सुप्रीम कोर्टाने सुनावणीदरम्यान म्हटले, 'महाराष्ट्रातील अशा प्रकारची प्रकरणे दररोज येत आहेत. तुम्ही जामीनाला जोरदार विरोध करता, पण खटल्यांची सुनावणी वेगाने होण्यासाठी कोणतीही प्रभावी पावले उचलत नाही. जेव्हा आम्ही प्रकरणाची तपासणी करतो, तेव्हा पुरावे कमकुवत असल्याचे दिसते. त्यामुळे आम्ही तुम्हाला जनतेसमोर उघडे पाडू.'

अपहरण आणि खून प्रकरणातील एका आरोपीने न्यायालयाला सांगितले की, तो गेली चार वर्षे तुरुंगात असून त्याचा खटला ट्रायल कोर्टात ८६ वेळा लिस्टेड झाला होता. त्याने सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, त्याला ५३ वेळा न्यायालयातच हजर करण्यात आले नाही. यावर सर्वोच्च न्यायालयाने ही बाब महाराष्ट्र सरकारची गंभीर चूक असल्याचे म्हटले आहे.


(वर्ष ६५ वे अंक १७८) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार, दि.१२ जुलै २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## बदला नक्कीच घेतला जाईल, मोजतबा खामेनी यांचा अयातुल्ला अली खामेनींच्या हत्येचा बदला घेण्याचा इशारा

तेहराण दि.११ (वृत्तसंस्था)- अमेरिका आणि इराणमधील संघर्ष पुन्हा एकदा भडकला आहे. दोन्ही देश एकमेकांवर हल्ले करत असल्यामुळे मध्य पूर्वेत पुन्हा युद्धाचे ढग गडद झाले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी काही दिवसांपूर्वी दोन्ही देशांमधील शस्त्रसंधी संपुष्टात आल्याची घोषणा केली. त्यामुळे आता अमेरिका-इराण युद्ध कधी थांबणार? याकडे अवघ्या जगाचं लक्ष लागलेलं आहे.

डोनाल्ड ट्रम्प हे सातत्याने वेगवेगळी वक्तव्ये करत इराणला थेट हल्ल्याच्या धमक्या देत आहेत. असं असतानाच आता आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे. इराणचे सर्वोच्च नेते मोजतबा खामेनी यांनी अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूचा बदला घेण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी कोणत्याही थराला जाण्याची आपली तयारी असल्याचं मोजतबा खामेनी यांनी स्पष्ट केलं आहे.

मोजतबा खामेनी यांनी शनिवारी आपल्या अधिकृत टेलिग्राम खात्यावर एक लेखी संदेश जारी केला आहे. यामध्ये मोजतबा खामेनी यांनी म्हटलं की, ''अमेरिकेने केलेल्या हल्ल्यात मारले गेलेले त्यांचे नेते, नागरिक आणि वडील यांच्या मृत्यूचा बदला घेणं ही 'राष्ट्राची मागणी' आहे, तो बदला नक्कीच घेतला जाईल. हुतात्मा नेते आणि युद्धांमधील सर्व हुतात्म्यांच्या रक्ताचा बदला घेण्याचा संकल्प आम्ही करतो'', असं मोजतबा खामेनी यांनी संदेशात म्हटलं आहे. या संदर्भातील वृत्त न्यूयॉर्क पोस्टने दिलं आहे.

### माझी हत्या झाली तर इराणवर बॉम्बहल्ला करा-डोनाल्ड ट्रम्प

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणविरोधात आक्रमक भूमिका घेतल्याचं दिसून येत आहे. ''जर इराणने माझी हत्या करण्यात यश मिळवलं, तर त्या देशावर यापूर्वी कधीही न झालेल्या पातळीवर बॉम्बहल्ले करण्याच्या सूचना मी आधीच दिल्या आहेत'', असं ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

'न्यूयॉर्क पोस्ट'ला दिलेल्या एका मुलाखतीत ट्रम्प म्हणाले की, ''मी अनेक वर्षांपासून इराणच्या लक्ष्यावर आहे. ज्याचा आम्ही सामना करत आहोत.'' अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना लक्ष्य करण्याच्या इराणी कटाबाबत इस्रायलने माहिती दिली होती, मात्र, सध्या त्यांच्या हत्येचा कोणताही ताजा कट उघड झालेला नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

इस्रायलने ट्रम्प यांच्या हत्येच्या कथित इराणी कटाबाबत माहिती दिल्याच्या वृत्तांवर ट्रम्प यांनी सांगितलं की, ''नाही, इस्रायलकडून अशी कोणतीही नवीन माहिती मिळालेली नाही. मी इराणच्या यादीत पहिल्या क्रमांकावर बराच काळ आहे,'' असं सांगितलं. ट्रम्प म्हणाले, ''मी स्पष्ट सूचना देऊन ठेवल्या आहेत. माझ्याबाबत काही घडलं, तर इराणवर अशा स्तरावर बॉम्बहल्ले करा, जे त्यांनी यापूर्वी कधीही पाहिले नसतील.''

## राज्य सरकारकडून ८४.२३ कोटींची मदत मंजूर, २१ जिल्ह्यांना लाभ; अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- राज्यात चालू वर्षी एप्रिल व मे या काळात विविध जिल्ह्यांमध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतीपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. राज्य सरकारने ८४ कोटी २३ लाख ६५ हजार रुपयांच्या मदतीस मंजुरी दिली आहे. महसूल व वन विभागाने या संदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे.

राज्य आपत्ती प्रतिसाद निधी (एमडीआरएफ) अंतर्गत ही मदत वितरित केली जाणार असून, शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट (डीबीटी) रक्कम जमा केली जाणार आहे. संबंधित जिल्हा प्रशासनाने लाभार्थ्यांची माहिती पडताळून ती संगणकीय प्रणालीवर नोंदविली जाणार आहे.

या मदतीचा लाभ राज्यातील ४५,०४२ शेतकऱ्यांना मिळणार असून, सुमारे ३८,३५८ हेक्टर क्षेत्रावरील पिकांच्या नुकसानीसाठी ही आर्थिक मदत दिली जाणार आहे.

सर्वाधिक मदत अमरावती विभागाला मिळाली असून, तेथील २८,५७१ शेतकरी आणि ३०,३२५ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ६८.०९ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. त्याखालोखाल नागपूर विभागासाठी ६.०७ कोटी, नाशिक विभागासाठी ५.२४ कोटी, पुणे विभागासाठी ३.७३ कोटी, छत्रपती संभाजीनगर विभागासाठी ७६.९९ लाख आणि कोकण विभागासाठी ३२.१४ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

नागपूर, गोंदिया, वर्धा, नाशिक, जळगाव, अहिल्यानगर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नांदेड, धाराशिव, हिंगोली, लातूर, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, सांगली, पुणे आणि कोल्हापूर या जिल्ह्यांतील बाधित शेतकऱ्यांना या मदतीचा लाभ मिळणार आहे. मदतीचा निधी बँकांकडून कर्जवसुलीसाठी वळवता येणार नाही. तसेच मदत वितरण पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांची यादी आणि मदतीचा तपशील संबंधित जिल्ह्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत, अशी माहिती आपत्ती व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी दिली.


## भरमसाठ कोसळल्यानंतर राज्यावर मान्सून पुन्हा रुसला; अरबी समुद्र अन् उत्तर भारतात कमी दाबाचा पट्टा

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- राज्यासह देशावर अल निनोच्या संकटाचे ढग आहे. अशातच जूनमध्ये रुसून बसलेल्या पावसाने जुलैच्या पहिल्या आठवड्यात दमदार हजेरी लावत बहुतांश जिल्ह्यांना अक्षरशः झोडपून काढलं. मात्र जुलै महिन्याच्या सुरुवातीला बरसणाऱ्या पावसाने पुन्हा एकदा विश्रांती घेतली आहे. राज्यात मान्सूनने दमदार बॅटिंग करत जून महिन्यातील पावसाची तूट भरून काढली. तर कुठे जलसंकाटाचे ढग काहीसे निवळले होते. असे असताना परत एक चिंता वाढवणारी बातमी समोर आली आहे. प्रशांत महासागरात सक्रिय होत असलेल्या अल निनोमुळे मान्सूनचा वेग अचानक मंदावला आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार, १० जुलै ते १५ जुलै दरम्यान उत्तर, पश्चिम आणि मध्य भारतासह महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवर पावसाचे प्रमाण कमालीचे घटणार आहे. सध्या अरबी समुद्रात आणि उत्तर भारतात निर्माण झालेला कमी दाबाचा पट्टा कमकुवत होऊन पुढे निघून गेल्यामुळे ढगांची दाटी विरळ झाली आहे. १९ जुलैपर्यंतही हीच स्थिती कायम राहू शकते. दरम्यान, मुंबई-कोकणात मध्यम स्वरूपाचा पाऊस, तर उर्वरित महाराष्ट्रात उन्हाचा चटका वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मुंबईत जूनमध्ये पावसाने ओढ दिल्यानंतर जुलै महिन्याच्या पहिल्या पाच दिवसातच पावसाने दमदार हजेरी लावली आहे. जुलै महिन्याच्या ३१ दिवसांत मिळून पडणाऱ्या पावसाच्या सरासरीहून अधिक पाऊस अवघ्या पाच दिवसांत पडला आहे.

## व्हिएतनाममध्ये भारतीय पर्यटकांना घेऊन जाणारी बोट उलटल्यामुळे १५ पर्यटकांचा मृत्यू; पंतप्रधान मोदींकडून शोक व्यक्त

इनोई दि.११ (वृत्तसंस्था)- व्हिएतनामच्या फु क्वोक बेटाजवळ भारतीय पर्यटकांना घेऊन जाणारी एक बोट उलटल्याची माहिती मिळत आहे. या दुर्घटनेनंतर बचावकार्य सुरू करण्यात आले असून भारतीय दूतावासाने स्थानिक अधिकाऱ्यांशी समन्वय साधून बचावकार्याची माहिती घेतली. व्हिएतनाममधील भारतीय दूतावासाने सांगितले की, ते परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून स्थानिक प्रशासनाच्या संपर्कात आहेत. दरम्यान दुर्घटनेत आतापर्यंत १५ पर्यटकांचा मृत्यू झाल्याची माहिती रॉयटर्स वृत्तसंस्थेने दिली आहे.



दूतावासाने एक्स अकाऊंटवरून या अपघाताची माहिती दिली. ''काही तासांपूर्वी फु क्वोक बेटाजवळ अनेक भारतीय पर्यटकांना घेऊन जाणारी एक बोट उलटल्याची एक दुःखद घटना घडली आहे. घटनेचा तपशील मिळवला जात आहे. स्थानिक प्रशासन बचाव आणि शोध कार्य करत आहे'', अशी माहिती पोस्टमध्ये देण्यात आली आहे.

दरम्यान या घटनेशी संबंधित काही व्हिडीओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. दरम्यान समुद्रात उलटलेली बोट दिसताच जवळच्या इतर पर्यटक बोटी तात्काळ मदतीसाठी घटनास्थळी धावून आल्या आणि त्यांनी बचावकार्य सुरू केले. भारतीय दूतावासाने बाधित कुटुंबांना माहिती आणि मदत पुरवण्यासाठी हो चि मिन्ह शहरात एक नियंत्रण कक्षही स्थापन केला आहे.

या पोस्टमध्ये दूतावासाने नमूद केल्यानुसार, बाधित कुटुंबांना मदत पुरवली जात आहे. तसेच नातेवाईकांनी संपर्क साधावा यासाठी काही फोन नंबरही एक्स पोस्टमध्ये शेअर करण्यात आले आहेत. आम्ही प्रत्येक मदतीसाठी आणि तुमच्या प्रश्नांसाठी उपलब्ध आहोत, असेही या मजकूरात नमूद केले आहे.

## देवेंद्र फडणवीस दिल्लीत गेल्यास चंद्रशेखर बावनकुळे राज्याचे मुख्यमंत्री होतील, खासदार संजय राऊतांचा दावा

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- मुंबईत रामरक्षा आंदोलन केल्यानंतर आता नागपुरात आंदोलन शिवसेना ठाकरे पक्षाकडून करण्यात येणार असल्याची घोषणा खासदार संजय राऊत यांनी केली आहे. शिवसेनेने रामरक्षा आंदोलन जे सुरू केले त्याचा पहिला टप्पा मुंबईत पार पडला. दुसरा टप्पा महाराष्ट्राच्या उपराजधानीमध्ये १८ तारखेला साडेचार वाजता होईल. स्वतः शिवसेना पक्षप्रमुख, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे आणि असंख्य आमचे मुंबईतले नेते व विदर्भातले कार्यकर्ते यात सहभागी होतील, असे राऊत म्हणाले.

संजय राऊत म्हणाले, १८ जुलैला शिवसेना पक्षप्रमुख नागपूरला रामरक्षा आंदोलनात सहभागी होतील. राम मंदिर लूट प्रकरणामध्ये देशात असंतोष आहे, आजही मुख्य आरोपी पकडले गेले नाहीत, आजही लूट सुरू आहे. स्वतःला हिंदुत्ववादी समजणाऱ्या संस्था आणि संघटनांनी पुरस्कृत केलेले डाकू आणि चोर आजही अयोध्येमध्ये आहेत. त्यांनी राम मंदिराची आणि रामाची पूर्ण बदनामी केल्याचा हल्लाबोल राऊत यांनी केला. राऊत यांनी सांगितले की, ज्येष्ठ मंत्री म्हणून जर देवेंद्र फडणवीस केंद्रात गेले, तर १०० टक्के मला असं वाटतं की चंद्रशेखर बावनकुळे यांचा विचार आणि शिफारस हे स्वतः देवेंद्र फडणवीसच करतील, हे माझं आकलन आहे. फडणवीसांनी २०२९ पूर्वी पीएम व्हावं अशीही टिप्पणी त्यांनी केली. राज्याच्या मुख्यमंत्रीपदी येणाऱ्या योग्य व्यक्तीला नेहमी शुभेच्छा दिल्या पाहिजेत, जो राज्याचं हित पाहील, जो राज्य योग्य दिशेने पुढे घेऊन जाईल आणि जो या राज्याचा स्वाभिमान टिकवेल अशी कोणी व्यक्ती असेल तर त्याला शुभेच्छा देणं हे आमचं कर्तव्य असल्याचे ते म्हणाले.

## मोशी कचरा डेपो इमारत दुर्घटनेतील सात जणांचे मृतदेह सापडले; मृतांची संख्या आठ

पिंपरी दि.११ (प्रतिनिधी)- पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशी कचरा डेपोतील कचऱ्याचा डोंगर कोसळून इमारत ढासळल्याच्या दुर्घटनेत कचऱ्याखाली दबलेल्या सात जणांचे मृतदेह चौथ्या दिवशी शनिवारी सापडले. इमारतीच्या बाजूला दुसरीकडे कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली दबलेल्या एका व्यक्तीचा शोध सुरू आहे. आतापर्यंत या दुर्घटनेत आठ जणांचा मृत्यू झाला आहे.

मोशी दुर्घटनेत कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली दबलेल्या नऊ कामगारांची बुधवारी सुखरूप सुटका करण्यात आली होती. गुरुवारी सकाळी भावेश वाणी यांचा मृतदेह सापडला होता. ढिगाऱ्याखाली दबलेल्या आठ कामगारांना बाहेर काढण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या मार्गदर्शनाखाली बचाव कार्य राबविण्यात येत होते. दुर्घटनाग्रस्त इमारतीचा काँक्रिटचा भाग फोडून शनिवारी शोधकार्य राबविण्यात आले. त्यामध्ये सात जणांचे मृतदेह सापडले. अक्षय सावंत (वय ३५, रा.मोशी) सुनील कोरके (वय ४०, आळंदी), सन्नी माने (वय ३९, गंधर्वनगरी, मोशी), महेश कुंभार (वय ३३, छत्रपती संभाजीनगर), नागेश गायकवाड (वय २६, संजय गांधी नगर, मोशी), रणजीत पाटील (वय २२, मोशी) आणि राहुल गायकवाड यांचे मृतदेह सापडले आहेत. त्यांच्या मृतदेहांचे वायसीएम रुग्णालयात शवविच्छेदन केले जाणार आहे. त्यानंतर पोलिसांकडून मृतदेह नातेवाईकांकडे सुपूर्द करण्यात येणार आहेत.

कचऱ्याचा ढिगारा कोसळल्याने इमारत ढासळली होती. या इमारतीमध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा अडकला होता. जेवढा कचरा उचलला जात होता, तेवढा कचरा डोंगरावरून कोसळत होता. कचऱ्याचा ढिगारा उपसताना यंत्रणांची दमछाक झाली होती. जेसीबी, पोकलेन आणि डंपरच्या माध्यमातून कचरा हटविण्यात आला.

तीन दिवसांच्या शोध कार्यानंतरही कोणाचाही शोध लागत नसल्याने शनिवारी दुर्घटनाग्रस्त इमारतीचा काँक्रिटचा भाग फोडण्यात आला. त्यामुळे जवानांना आतमध्ये शिरण्यासाठी मार्ग मिळाला. त्यानंतर दुपारपासून मृतदेह सापडण्यास सुरुवात झाली. दुपारी अडीच वाजता एक मृतदेह सापडला. आठ वाजेपर्यंत सात जणांचे मृतदेह सापडले.

## देवेंद्र फडणवीस दिल्लीला गेले कि राज्याच नेतृत्व एकनाथ शिंदे यांच्याकडे सोपवावे-आ.बच्चू कडू

मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रातला प्रत्येक माणसाला वाटत कि महाराष्ट्रातल्या नेत्याने देशाचं नेतृत्व करावं, एक काळ असा होता कि देशभरात मराठयांच राज्य होतं. त्याच प्रमाणे देवेंद्र फडणवीस यांनी मराठे म्हणून दिल्लीला जावे आणि देशाचं उज्वल स्वप्न पूर्ण करावे, अशी सर्वांची अपेक्षा आहे. देवेंद्र फडणवीस दिल्लीला गेले कि राज्यच नेतृत एकनाथ शिंदे यांच्याकडे सोपवावे, अशी मागणी शिवसेना शिंदे गटाचे विधान परिषदेचे आमदार बच्चू कडू यांनी केली आहे. ते नागपुरात बोलत होते. एकनाथ शिंदे यांनी उठाव केला म्हणून महाराष्ट्रात भाजप सत्तेत परत आली. त्यामुळे संख्याबळाचा विचार न करता नैतिकतेच्या आधारावर देवेंद्र फडणवीस जर दिल्लूलीवर गेलेत तर राज्याचं नेतृत एकनाथ शिंदे यांनाच मिळायला पाहिजे. असेही बच्चू कडू म्हणाले.

ज्येष्ठ मंत्री म्हणून जर देवेंद्र फडणवीस केंद्रात गेले, तर १०० टक्के मला असं वाटतं की चंद्रशेखर बावनकुळे यांचा विचार आणि शिफारस हे स्वतः देवेंद्र फडणवीसच करतील, हे माझं आकलन आहे. अशी प्रतिक्रिया ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी दिली आहे. यावर बोलताना बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया देत भाष्य केलं आहे.

## लाडकी बहीण योजनेची एसआयटी चौकशी करा; सुप्रिया सुळेंची मागणी

नाशिक दि.११ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून आठ लाख महिलांना बाहेर काढण्यात आले. इतके आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध असताना सरकारला ई-केवायसी करता न येणे हे हास्यास्पद असून, ते यंत्रणेचे अपयश आहे. लाडकी बहीण योजनेत पुरुष कसे लाभार्थी झाले, सरकारी कर्मचारी कसे समाविष्ट झाले, याचे लेखापरीक्षण झाले पाहिजे. त्यासाठी सरकारने विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करावे, अशी मागणी राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली.

शनिवारी खा. सुळे यांच्या हस्ते येथे यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. त्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी लाडकी बहीण योजनेसह महाराष्ट्रातील वाढती गुन्हेगारी, अंमली पदार्थांच्या विळख्यात अडकणारी तरुणाई, अयोध्येतील श्रीराम मंदिरातील कथित गैरव्यवहार, राज्यातील वाढती अंधश्रद्धा, शेतकरी कर्जमाफी आदी विषयांवरून सत्ताधाऱ्यांवर टीका केली.

महाराष्ट्रात बुवाबाजी आणि अंधश्रद्धा वाढत असून, त्याविरोधात कायदा करूनही त्याची प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही. बुवाबाजीमुळे महिलाच सर्वाधिक भरडल्या जात असल्याचे दुर्दैव असल्याचे त्यांनी म्हटले. शेतकरी कर्जमाफीची घोषणा झाली; मात्र आजतागायत तिची अंमलबजावणी झालेली नाही.

राज्यात गुन्हेगारी आणि अंमली पदार्थांची विक्री मोठ्या प्रमाणात वाढल्याची आकडेवारी असून, पोलिसांचा धाक राहिलेला नसल्याचा आरोपही त्यांनी केला. अयोध्येतील श्रीराम मंदिरातील कथित गैरव्यवहाराच्या प्रकरणावरून त्यांनी, हे आपल्या सर्वांच्या श्रद्धेचे स्थान असून, सरकारला याबाबत उत्तर द्यावे लागेल. श्रीराम मंदिरासाठी भाजपच्या अनेक ज्येष्ठ नेत्यांनी लढा दिला. अशा ठिकाणी भ्रष्टाचार होत असेल, तर यापेक्षा गलिच्छ, काही असू शकत नाही, असे नमूद केले.

'केवळ मनसेमध्ये पाठवायचे बाकी' शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार फुटल्यानंतर प्रसारमाध्यमांतून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)विषयी विविध चर्चा सुरू आहेत. पक्ष सत्तेत सहभागी होणार असल्यापासून खासदार अस्वस्थ असल्याची चर्चा होत आहे. यामुळे आपण व्यथित असल्याचे खा. सुप्रिया सुळे यांनी पुरस्कार सोहळ्यात नमूद केले. पत्रकार परिषदेत त्या म्हणाल्या, माध्यमे आमच्या पक्षाच्या खासदारांना रोज वेगवेगळ्या पक्षांत पाठवत आहेत. आता फक्त मनसेमध्ये पाठवायचे बाकी राहिले आहे. मुळात आम्ही फुटण्यासाठी नव्हे, तर धोरणे ठरविण्यासाठी निवडून आलो आहोत. आमच्या एकाही खासदाराने उलटसुलट विधाने केलेली नाहीत, असे त्यांनी स्पष्ट केले.

## राम मंदिराच्या दानचोरी विरोधात आंदोलन करणाऱ्या काँग्रेस शहराध्यक्षाला जीवे मारण्याची धमकी! मराठवाड्यात खळबळ

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर जिल्हा काँग्रेसमध्ये झालेल्या खांदेपालटानंतर शहर आणि ग्रामीण भागात पक्षाच्यावतीने विविध आंदोलने हाती घेतली जात आहेत. अयोध्येतील राम मंदिरातील देणगी घोटाळा समोर आल्यानंतर काँग्रेसचे शहराध्यक्ष सय्यद अक्रम यांच्या नेतृत्वाखाली निषेध आंदोलन करण्यात आले होते. त्यानंतर अक्रम यांना कुटुंबासह जीवे मारण्याची धमकी देणारे मेसेज फोनवरून दिले जात आहेत. संबंधिताने दोन मोबाईल क्रमांक देत यावर संपर्क साधण्यास सांगितले.

पोलिसांकडे तक्रार केली तर तुमच्यासह कुटुंबाला संपवू अशी धमकी मोबाईलवरील मॅसेजमधून देण्यात आली आहे. या प्रकरणी सय्यद अक्रम यांनी पोलीस उपायुक्त सातव यांची भेट घेऊन त्यांच्याकडे लेखी निवेदन दिले आहे. आम्ही राहुल गांधी यांचे बब्बर शेर आहोत, अशा धमक्यांना घाबरणार नाही, असे अक्रम यांनी म्हटले आहे. सैयद अक्रम आणि त्यांच्या कुटुंबीयांना अज्ञात व्यक्तीकडून एसएमएसद्वारे जीवे मारण्याच्या धमक्या मिळाल्याचा प्रकार समोर आल्याने एकच खळबळ उडाली आहे.

या प्रकरणी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने पोलिस आयुक्त कार्यालयात भेट देऊन तक्रार केली असून, धमकी देणाऱ्यांचा तातडीने शोध घेऊन कठोर कारवाईची मागणी केली आहे. दोन दिवसांपूर्वी सय्यद अक्रम यांच्या मोबाईलवर अज्ञात व्यक्तीकडून जीवे मारण्याच्या धमकीचे मेसेज येत आहेत. आम्ही तुम्हाला आणि तुमच्या संपूर्ण कुटुंबाला मारून टाकू. आम्ही तुमचा मोबाईल हॅक केला आहे आणि त्यावरूनच हा मेसज करत आहे. चुकूनही याची माहिती पोलीसांना देऊ नका. जर या संकटातून वाचायचे असेल तर ९१९३३६९२५७५ किंवा ९१६३९३०३०४७४ वर संपर्क करा असा मेसेज अज्ञातांकडून करण्यात आला आहे.


या धमकीनंतर काँग्रेस पक्षामध्ये खळबळ उडाली असून सय्यद अक्रम यांच्यासह शिष्टमंडळाने पोलीस उपायुक्त सातव यांची भेट घेऊन तक्रार दिली आहे. धमकी देणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाईची मागणी काँग्रेस पक्षाने केली आहे. कधी काळी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यावर वर्चस्व राखलेल्या काँग्रेस पक्षाची राजकीय अवस्था गेल्या काही वर्षापासून बिकट झाली आहे. लोकसभा, विधानसभा, महापालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका, नगरपंचायत, पंचायत समिती अशा सगळ्याच निवडणुकीत काँग्रेस पक्षाला अपयश आले आहे.

गेल्या कित्येक वर्षात काँग्रेस पक्षाचा आमदार, खासदार या जिल्ह्यातून निवडून गेलेला नाही. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातही या पक्षाचे बोटावर मोजण्या इतके सदस्य दिसतात. दरम्यान, नुकतीच काँग्रेस पक्षाने नव्याने शहर आणि ग्रामीण भागात संघटन बांधणी केली होती. या नव्या रचनेत अॅड. सय्यद अक्रम यांच्यावर शहराध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवण्यात आली.

त्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाने शेतकरी, महागाई, इंधन दरवाढीच्या विरोधात आंदोलन करत सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले. अयोध्येतील राम मंदिर देणगी घोटाळ्यावर नुकतेच काँग्रेस पक्षाने शहरातील गुलमंडी भागात निषेध आंदोलन केले होते. पक्षाला अच्छे दिन आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या काँग्रेस शहराध्यक्षांनाच कुटुंबासह जीवे मारण्याची धमकी आल्याने पक्षात चिंतेचे वातावरण आहे.

## एमपीएससी नोकरभरती घोटाळा व्यापमपेक्षाही मोठा; ऑनलाइन परीक्षा पद्धत तातडीने रद्द करा-हर्षवर्धन सपकाळ

नवी मुंबई दि.११ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रातील एमपीएससी नोकरभरतीतील घोटाळा हा मध्य प्रदेशातील व्यापम घोटाळ्यापेक्षाही मोठा आहे. एमपीएससीची संपूर्ण व्यवस्था भ्रष्ट झाली असून विद्यार्थ्यांचा ऑनलाइन परीक्षा पद्धतीवर विश्वास राहिलेला नाही. त्यामुळे ऑनलाइन परीक्षा आणि 'नॉर्मलायझेशन' पद्धत तातडीने रद्द करून पारदर्शक ऑफलाइन परीक्षा घ्याव्यात; अन्यथा काँग्रेस राज्यभर तीव्र आंदोलन उभारेल, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शनिवारी दिला.



सीबीडी बेलापूर येथील महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) मुख्यालयासमोर सीबीटी आणि 'नॉर्मलायझेशन'विरोधात काँग्रेसतर्फे सुरू असलेल्या बेमुदत साखळी उपोषण व ठिय्या आंदोलनाला भेट दिल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारवर जोरदार टीका करत, ''हे सरकार मुकं, बहिरं आणि आंधळं झालं आहे. विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची आणि त्यांच्या प्रश्नांवर निर्णय घेण्याची सरकारची इच्छाच दिसत नाही,'' असे म्हटले. चार दिवसांपासून आंदोलन सुरू असतानाही सरकारचा किंवा एमपीएससीचा एकही अधिकारी आंदोलनस्थळी फिरकला नसल्याचा आरोपही त्यांनी केला.एमपीएससीच्या ऑनलाइन परीक्षा पद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करत सपकाळ म्हणाले, खाजगी कंपन्यांना परीक्षा घेण्याचे कंत्राट दिल्यामुळे पारदर्शकतेवर प्रश्न निर्माण झाले आहेत. विद्यार्थ्यांचा या पद्धतीवरील विश्वास उडाला असून परीक्षा ऑफलाइन आणि पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने घेण्यात याव्यात. ऑनलाइन परीक्षा आणि 'नॉर्मलायझेशन' ही भ्रष्टाचाराला खतपाणी घालणारी व्यवस्था असल्याचाही त्यांनी आरोप केला.

# भारताच्या निर्यातीला युरोपचा आधार

रशिया-युक्रेन युद्ध, पश्चिम आशियातील संघर्ष, पुरवठा साखळीतील अडथळे आणि चीनमधील आर्थिक मंदीमुळे जगभरातील व्यापाराचे समीकरण बदलले आहे. अशा परिस्थितीत भारताच्या निर्यात क्षेत्राने युरोपीय बाजारपेठेत आपले स्थान अधिक मजबूत केले आहे. मात्र युरोपमधून भारतात होणाऱ्या आयातीतही लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे व्यापार वाढत असला तरी व्यापार संतुलनाचा प्रश्न गंभीर बनत आहे.

युरोपकडे वाढणाऱ्या निर्यातीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला अनेक स्तरांवर लाभ होत आहेत. उत्पादन क्षेत्र मजबूत झाल्यास भारताचा आर्थिक विकास अधिक शाश्वत होऊ शकतो. सेवाक्षेत्रानंतर उत्पादन क्षेत्र निर्यातीचा प्रमुख आधार बनू लागल्याची चिन्हे दिसत आहेत; मात्र या यशाच्या चित्रात काही गंभीर प्रश्नही दडलेले आहेत. युरोपमधून भारतात होणाऱ्या आयातीतही सातत्याने वाढ होत आहे. यंत्रसामग्री, औद्योगिक उपकरणे, वैद्यकीय तंत्रज्ञान, संरक्षण साहित्य, विमान उद्योगासाठी आवश्यक घटक, उच्च तंत्रज्ञानाची उत्पादने आणि विशेष रसायने यांची आयात मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. भारताचा औद्योगिक विकास वेगाने होत असला, तरी अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये आपण अजूनही परदेशी तंत्रज्ञानावर अवलंबून आहोत. त्यामुळे निर्यात वाढत असली तरी आयातीचे बिलही त्याच वेगाने वाढत आहे. औषध उद्योगाने युरोपमध्ये विश्वासार्ह पुरवठादार म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. कोवीडनंतर जगाने भारताच्या औषधनिर्मिती क्षमतेचा अनुभव घेतला आणि त्यानंतर भारतीय औषधांना युरोपमध्ये अधिक मागणी निर्माण झाली. त्याचबरोबर इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनातील वाढ, मेक इन इंडिया उपक्रम, उत्पादनाशी निगडित प्रोत्साहन योजना आणि जागतिक कंपन्यांची चीनवरील अवलंबित्व कमी करण्याची रणनीती याचा थेट फायदा भारतीय निर्यातीला होत आहे. युरोपमधील ग्राहकांमध्ये पर्यावरणपूरक आणि गुणवत्तापूर्ण उत्पादनांची मागणी सातत्याने वाढत आहे. भारतीय कंपन्यांनीही हरित उत्पादन, कार्बन उत्सर्जन कमी करणे, गुणवत्ता मानके आणि डिजिटल ट्रेसिबिलिटी यावर भर दिल्यामुळे त्यांना युरोपमध्ये अधिक संधी उपलब्ध होत आहेत.

भारताची उत्पादनक्षमता आणि तुलनेने स्पर्धात्मक किंमत हे देखील महत्त्वाचे बलस्थान ठरत आहे. विशेषतः उच्च मूल्याच्या यंत्रसामग्री आणि प्रगत तंत्रज्ञानासाठी युरोपवरील अवलंबित्व कायम आहे. भारतीय उद्योगांच्या आधुनिकीकरणासाठी ही आयात आवश्यक असली तरी दीर्घकालीन दृष्टीने देशांतर्गत संशोधन, तंत्रज्ञान विकास आणि उत्पादन क्षमता वाढवणे तितकेच गरजेचे आहे. अन्यथा, व्यापारातील तूट कायम राहण्याचा धोका आहे. भारत आणि युरोपीय महासंघ यांच्यात सुरू असलेल्या मुक्त व्यापार कराराच्या (एफटीए) वाटाघाटी या पार्श्वभूमीवर अधिक महत्त्वाच्या ठरतात. हा करार झाल्यास भारतीय उत्पादनांना युरोपमध्ये अधिक सुलभ प्रवेश मिळेल. युरोप आता केवळ व्यापार भागीदार राहिलेला नाही. हवामानबदल, हरित ऊर्जा, डिजिटल अर्थव्यवस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर, स्वच्छ तंत्रज्ञान आणि शाश्वत विकास या क्षेत्रांमध्येही भारत आणि युरोपमधील सहकार्य वाढत आहे. त्यामुळे व्यापाराला नव्या स्वरूपाची जोड मिळत आहे. मात्र युरोपने लागू केलेला 'कार्बन बॉर्डर ॲडजस्टमेंट मेकॅनिझम' (सीबीएएम) भारतीय निर्यातदारांसाठी भविष्यात मोठे आव्हान ठरू शकते. स्टील, ॲल्युमिनियम, सिमेंट यांसारख्या उत्पादनांच्या निर्यातीवर अतिरिक्त कार्बन खर्च लागू होऊ शकतो. त्यामुळे भारतीय उद्योगांना हरित उत्पादन प्रक्रियेकडे वेगाने वळावे लागेल.

युरोपकडे निर्यात वाढत असताना भारताने काही बाबींवर विशेष भर देणे आवश्यक आहे. उत्पादन खर्च कमी करणे, लॉजिस्टिक्स अधिक कार्यक्षम करणे, बंदरांची क्षमता वाढवणे, गुणवत्ता प्रमाणपत्रांची प्रक्रिया सुलभ करणे आणि सूक्ष्म, लघू तसेच मध्यम उद्योगांना (एमएसएमई) युरोपियन बाजारपेठेतील नियम समजावून देणे ही काळाची गरज आहे. निर्यात वाढवायची असेल, तर केवळ मोठ्या उद्योगांवर अवलंबून राहून चालणार नाही. लघुउद्योगांना जागतिक मूल्यसाखळीत सामील करणे आवश्यक आहे. त्याच वेळी आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी देशांतर्गत उत्पादनाला अधिक चालना देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. संशोधन आणि विकासासाठी अधिक गुंतवणूक, उच्च तंत्रज्ञानाचे स्थानिकीकरण, कौशल्य विकास आणि नवोन्मेष यांना प्राधान्य दिल्याशिवाय भारत दीर्घकालीन व्यापार संतुलन साधू शकणार नाही. भारताची निर्यात वाढत असणे ही नक्कीच समाधानाची बाब आहे.

निर्यात हे केवळ परकीय चलन मिळवण्याचे साधन नसून देशाच्या औद्योगिक सामर्थ्याचे प्रतिबिंब असते. त्यामुळे युरोपमधील वाढती निर्यात ही भारतासाठी निश्चितच आशादायी संधी आहे; मात्र तिचे रूपांतर दीर्घकालीन आर्थिक सामर्थ्यात करायचे असेल, तर वाढत्या आयातीचे व्यवस्थापन आणि स्पर्धात्मक उत्पादनक्षमता यांवर तितक्याच गांभीर्याने काम करावे लागेल. हाच भारताच्या पुढील आर्थिक प्रवासाचा खरा मार्ग ठरणार आहे. नीती आयोगाच्या ताज्या अहवालानुसार, भारताचा आयात-निर्यात व्यापार फोफावत आहे. जानेवारी ते मार्च २०२६ या तिमाहीमध्ये एकूण व्यापार ५.४ टक्क्यांनी वाढून, तो १.८४ ट्रिलियन डॉलर्सवर पोहोचला आहे; परंतु चिंतेची बाब म्हणजे, निर्यातीपेक्षा (४.२ टक्के) आयात (६.५ टक्के) अधिक वेगाने वाढत आहे. म्हणजेच भारताचे बाह्य अवलंबित्व जास्त आहे. वेगवेगळ्या वस्तूंची निर्यात २.८ टक्क्यांनी घटून, ११२ अब्ज डॉलर्सवर आली आहे, तर आयात जवळपास बारा टक्क्यांनी वाढून १९५ अब्ज डॉलर्सवर जाऊन पोहोचली आहे. उत्पादनक्षेत्र अजूनही दबावाखाली आहे आणि सेवाक्षेत्र, विशेषतः आयटी व डिजिटल सेवा यांनी भारताला आधार दिला आहे. त्याचप्रमाणे विद्युत यंत्रसामग्री, अणुभट्टी, खनिज इंधन, लोह व पोलाद आणि वाहने यांच्या निर्यातीत लक्षणीय वाढ झाली आहे, तर आयातीमध्ये सर्वाधिक वेगाने सोने आणि चांदी यांच्यात उल्लेखनीय वाढ झाली असून ही काळजी करण्यासारखीच बाब आहे.

# !!! लोकसंख्यावाढ : प्रचंड मोठे आव्हान !!!

**दरवर्षी लोकसंख्या दिनाची मोहीम प्रजनन आरोग्य, कुटुंब नियोजन याविषयी जगभरातील लोकांची माहिती आणि कौशल्य वाढवण्याचे काम करते. जगभरात दरवर्षी सुमारे १.८ अब्ज तरुण-तरुणी प्रजनन वयात प्रवेश करत असतात. त्यामुळे प्रजनन आरोग्याच्या प्राथमिक बाबींकडे त्यांचे लक्ष वेधणे अनिवार्य आहे, त्यातही १५ ते १९ वयोगटातील किशोरवयीनांच्या लैंगिकतेशी संबंधित समस्या सोडविण्याची अत्यंत आवश्यकता आहे. कारण आकडेवारीनुसार या वयोगटांतील सुमारे दीड कोटी महिला माता बनतात आणि सुमारे चाळीस लाख महिला गर्भपात करवून घेतात. काही धर्मातील बांधव शासनाच्या कुटुंबनियोजन कार्यक्रमास खोडा घालतात. चांगली कबड्डीची टीम तयार होईल, इतक्या संख्येत अपत्ये जन्मास घालतात. अधिक मुले होणे देवाची देणगी म्हणतात. सांगा, मग जन संख्यावृद्धीस आळा कसा बसेल? अशा अंधश्रद्धाळू लोकांना लोकसंख्याशिक्षण सक्तीनेच देणे आज काळाजी गरज वाटत आहे. खरं तर, राष्ट्रीय कार्यास सहकार्य करणे, हे माझ्यासह प्रत्येक नागरिकाचे परम कर्तव्य आहे. हे विसरता कामा नये. यावर प्रकर्षाने प्रकाश टाकण्याचा प्रयत्न श्री निकोडे गुरूजी उर्फ श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे हे या लेखातून करताहेत... संपादक.**



जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्याची उद्दिष्टे अशी- दि.११ जुलै १९८७ रोजी जागतिक लोकसंख्या सुमारे पाच अब्ज भरली होती. त्यामुळे लोकसंख्येचा विस्फोट हा सार्वजनिक स्तरावरील सर्वाधिक स्वारस्यपूर्ण विषय बनला होता. या स्वारस्यात दिवसेंदिवस वाढ होत राहिल्यामुळे लोकसंख्या वाढीच्या संदर्भात अनेक कार्यक्रम राबविण्यात येऊ लागले. सन १९८९मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकासविषयक कार्यक्रम- युएनडीपीच्या गव्हर्निंग कौन्सिलने ११ जुलै हा दिवस आंतरराष्ट्रीय लोकसंख्या दिन म्हणून जगभर साजरा केला जावा, अशी शिफारस केली. या शिफारशीनुसार हा दिवस नेमाने साजरा केला जातो. त्यानिमित्ताने विविध कार्यक्रम जगभर आयोजित केले जातात. लोकसंख्यावाढीमुळे जाणवर्णाया समस्यांकडे लोकांचे लक्ष वेधणे, त्याविषयी जनजागृती करणे आणि या समस्येशी लढा देणे यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

वाढत्या लोकसंख्येचे दुष्परिणाम आज मानवास बेजार करीत आहेत. ते असे- बेरोजगारी: लोकसंख्या वाढल्याने लोक रोजगाराच्या शोधात वेगवेगळ्या शहरांकडे वळू लागले. नोकरीच्या संधी कमी झाल्याने बेरोजगारी वाढूही लागली. परिणामी गरिबीमध्येही झपाट्याने वाढ होऊ लागली. साधनसंपत्तीची कमतरता भासू लागली. रोगराई: वाढत्या लोकसंख्येमुळे आरोग्याच्या सोयी देखील अपुऱ्या पडू लागल्या. साथीचे रोग मोठ्या प्रमाणात पसरू लागले. प्रदूषण: प्रदुषणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होऊ लागला. पोटासाठी जंगले तोडून वन्यजीवांना मारण्याचे प्रकार वाढू लागले. यामुळे निसर्गाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. आपले भविष्य वाचवण्यासाठी लोकसंख्या नियंत्रणात राहणे, अतिशय गरजेचे आहे. यासाठी प्रत्येकाने योगदाने द्यावे. वाढत्या लोकसंख्येच्या समस्यांविषयी समाजातील भरपूर लोकांना एकत्रितपणे काम करायला लावण्यात येते. आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध प्रकारचे कार्यक्रम आखून, कृती आयोजित करून जागतिक लोकसंख्या दिन साजरा केला जातो. चर्चासत्रातील चर्चा, शैक्षणिक स्पर्धा, शैक्षणिक माहिती सत्रे, निबंधलेखन स्पर्धा, विविध विषयांवर सार्वजनिक स्पर्धा, पोस्टर वितरण, गाणी, क्रीडाविषयक कार्यक्रम, व्याख्याने व कविता, कलात्मक काम, घोषणा, मध्यवर्ती कल्पना व संदेश यांचे वितरण, कार्यशाळा, भाषणे, वादविवाद, गोलमेज चर्चा, पत्रकार परिषदा, विविध वृत्तवाहिन्या आणि इतर अनेक माध्यमांतून बातम्यांचे वितरण यांसारख्या अनेकविध कार्यक्रमांचा त्यामध्ये समावेश असतो. लोकसंख्यावाढीच्या समस्या सोडवण्यासाठी विविध प्रकारच्या आरोग्य संघटना आणि लोकसंख्याविषयक विभाग एकत्रितपणे काम करतात. त्यासाठी परिषदा, संशोधन कार्ये, बैठका, प्रकल्प विश्लेषण इत्यादी अनेक कार्यक्रमांची आखणी केली जाते.

सन २०११मध्ये जागतिक लोकसंख्या सात अब्जांवर पोहोचली, तेव्हा वाढती लोकसंख्या हे विकासासमोरचे एक प्रचंड मोठे आव्हान असल्याचे लक्षात आले. त्यामुळे प्रजननविषयक आरोग्य सेवांची सार्वत्रिक उपलब्धता हा संदेश सन २०१२च्या जागतिक लोकसंख्या दिनाच्या कार्यक्रमानिमित्त जगभर दिला गेला. त्यावेळी जागतिक लोकसंख्या ही सुमारे ७ अब्ज २ कोटी ५० लाख ७१ हजार ९६६ एवढी होती. समाजातील जास्तीत जास्त कुटुंबे छोटी आणि आरोग्यपूर्ण असावीत तसेच लोकांना शाश्वत भवितव्य मिळावे, यासाठी मोठी पावले उचलली गेली. प्रजननविषयक आरोग्यासाठी आवश्यक त्या सुविधांचा मागणीनुसार पुरवठा व्हावा, या अनुषंगाने महत्त्वपूर्ण गुंतवणूक करण्यात आली. प्रजननविषयक आरोग्यात वाढ करून आणि लोकसंख्यावाढीचा दर घटवून सामाजिक दारिद्य कमी करण्यासाठीही पाऊल आजमितीस उचलले गेले.

जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्याची उद्दिष्टे- मुले आणि मुलींच्या तरुणाईचे समान संरक्षण करणे आणि त्यांचे सक्षमीकरण करणे. तरुण-तरुणींना आपल्या जबाबदाया समजून घेण्याची क्षमता येईपर्यंत त्यांना लैंगिकता आणि उशिरा लग्न करण्यासंबंधीची तपशीलवार माहिती देणे. संतती नियमनविषयक योग्य साधने वापरून उपाययोजना योजून अनैच्छिक गर्भारपण टाळण्यासाठी तरुणाईला शिक्षित करणे. समाजातून लिंगनिहाय तेच ते- स्टिरिओटाईप दृष्टिकोन हद्दपार करण्यास लोकांना शिक्षित करणे. कमी वयातील प्रसूतीच्या धोक्यांविषयी जागृती करण्यासाठी गर्भारपणाशी संबंधित आजारांविषयी शिक्षित करणे. लैंगिक संबंधातून संक्रमित होर्णाया आजारांविषयी शिक्षित करणे. मुलींच्या हक्कांचे संरक्षण करण्यास काही प्रभावी कायदे करण्याची आणि धोरणे आखण्याची मागणी करणे. मुलांना आणि मुलींना समान प्राथमिक शिक्षण मिळेल याची खात्री करणे.

मूलभूत प्राथमिक आरोग्याचा एक भाग म्हणून प्रत्येक जोडप्याला प्रजननविषयक आरोग्य सेवा सहजगत्या सर्वत्र उपलब्ध होतील याची खात्री करून घेणे. दि.१ जानेवारी २०१४ रोजी जागतिक लोकसंख्या ७ अब्ज १३ कोटी ७६ लाख ६१ हजार ३० वर पोहोचली. या वास्तवाची जाणीव करून देण्यासाठी जागतिक लोकसंख्या दिनाच्या वार्षिक कार्यक्रमात जागृती घडवून आणर्णाया विविध उपक्रमांची आणि कृतिशील कार्यक्रमांची आखणी करणे, आवश्यक आहे. या कार्यक्रमांमध्ये लोकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, यासाठी प्रोत्साहन देणेही आवश्यक आहे. अशा कार्यक्रमांमध्ये कुटुंबनियोजनाचे महत्त्व, लिंग समानता, माता आणि शिशू आरोग्य, गरिबी, मानवी हक्क, आरोग्याचा हक्क, लैंगिकतेचे शिक्षण, मुलींना शिक्षण, संततीनियमनाच्या साधनांचा व निरोधचा वापर करणे, प्रजननविषयक आरोग्याची माहिती घेणे, किशोरवयातील गर्भारपण व बालविवाह टाळणे, लैंगिक संबंधातून संक्रमित होर्णाया संसर्गांची माहिती घेणे, अशा उपाययोजनांचा समावेश असला पाहिजे. जगभरामध्ये गर्भवतींचे अनारोग्य आणि त्यांचे मृत्यू होण्याचे प्रमाण मोठे आहे. यामागे प्रजननविषयक आरोग्याच्या समस्या हे प्रमुख कारण आहे. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघाचा विकासविषयक कार्यक्रम- युएनडीपी त्याकडे आता विशेष लक्ष देत आहे. जागतिक स्तरावर प्रसूतीदरम्यान दररोज सुमारे आठशे महिलांचा मृत्यू होतो. या पार्श्वभूमीवर दरवर्षी लोकसंख्या दिनाची मोहीम प्रजनन आरोग्य, कुटुंब नियोजन याविषयी जगभरातील लोकांची माहिती आणि कौशल्य वाढवण्याचे काम करते. जगभरात दरवर्षी सुमारे १.८ अब्ज तरुण-तरुणी प्रजनन वयात प्रवेश करत असतात. त्यामुळे प्रजनन आरोग्याच्या प्राथमिक बाबींकडे त्यांचे लक्ष वेधणे अनिवार्य आहे, त्यातही १५ ते १९ वयोगटातील किशोरवयीनांच्या लैंगिकतेशी संबंधित समस्या सोडविण्याची अत्यंत आवश्यकता आहे. कारण आकडेवारीनुसार या वयोगटांतील सुमारे दीड कोटी महिला माता बनतात आणि सुमारे चाळीस लाख महिला गर्भपात करवून घेतात. काही धर्मातील बांधव शासनाच्या कुटुंबनियोजन कार्यक्रमास खोडा घालतात. चांगली कबड्डीची टीम तयार होईल, इतक्या संख्येत अपत्ये जन्मास घालतात. अधिक मुले होणे देवाची देणगी म्हणतात. सांगा, मग जन संख्यावृद्धीस आळा कसा बसेल? अशा अंधश्रद्धाळू लोकांना लोकसंख्याशिक्षण सक्तीनेच देणे आज काळाजी गरज वाटत आहे. खरं तर, राष्ट्रीय कार्यास सहकार्य करणे, हे माझ्यासह प्रत्येक नागरिकाचे परम कर्तव्य आहे. हे विसरता कामा नये.

!! विश्व लोकसंख्या दिवसाच्या सर्वांना सजगतेस्तव हार्दिक शुभेच्छा !!

श्री निकोडे गुरूजी उर्फ श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे.

# संघर्षातून घडलेले नेतृत्व : शिक्षण, जिद्द आणि कर्तव्यनिष्ठेची प्राचार्या प्रणाली दहाटे यांची प्रेरणादायी यशोगाथा

**काही** व्यक्ती पदामुळे मोठ्या होतात, तर काही आपल्या कार्यामुळे. काहींना अधिकार प्रतिष्ठा देतो, तर काहींच्या कर्तृत्वामुळे अधिकारालाही प्रतिष्ठा प्राप्त होते. शासकीय सेवेत काम करणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्याला जबाबदारी मिळते पण त्या जबाबदारीला संवेदनशीलता, प्रामाणिकपणा आणि दूरदृष्टीची जोड देणारे अधिकारीच समाजाच्या स्मरणात राहतात. अशाच कर्तव्यदक्ष, अभ्यासू आणि जिद्दी व्यक्तिमत्त्वाचे नाव म्हणजे प्राचार्या प्रणाली हिरामण दहाटे. ११ जुलै हा त्यांचा वाढदिवस, हा दिवस केवळ शुभेच्छांचा नसून एका संघर्षमय प्रवासाचा, शिक्षणाच्या सामर्थ्याचा आणि जिद्दीने घडवलेल्या यशाचा गौरव करण्याचा दिवस आहे.

आज त्या महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत भंडारा जिल्ह्यातील साकोली येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या तसेच राजुरा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी निगडित असलेल्या संस्थेचे नेतृत्व करताना त्यांनी प्रशासनातील पारदर्शकता, शिस्त, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि गुणवत्तापूर्ण कौशल्य विकास यांचा सुंदर संगम घडवून आणला आहे. परंतु या यशामागे संघर्षाचा दीर्घ इतिहास दडलेला आहे.

अमरावतीच्या एका सर्वसामान्य कुटुंबात त्यांचे बालपण गेले. होली क्रॉस शाळेतून दहावी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी शासकीय पॉलिटेक्निक, अमरावती येथून प्रथम श्रेणीत डिप्लोमा पूर्ण केला. त्यानंतर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातून अभियांत्रिकी पदवी विशेष प्राविण्यासह संपादन केली आणि पुढे नागपूर येथील जी. एच. रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयातून एम.टेक. पूर्ण केले. प्रत्येक टप्प्यावर गुणवत्तेचा ध्यास कायम ठेवत त्यांनी स्वतःची वाट स्वतः निर्माण केली.

त्यांच्या घरची परिस्थिती अत्यंत साधी होती. वडील राज्य परिवहन महामंडळात बस कंडक्टर म्हणून कार्यरत होते. चार मुली आणि एका मुलाच्या शिक्षणाची जबाबदारी पेलताना आर्थिक मर्यादा स्वाभाविक होत्या. अशा परिस्थितीत शिक्षणाची वाटचाल शक्य झाली ती शिष्यवृत्तीच्या आधारावर. त्या नेहमी कृतज्ञतेने सांगतात की, शिष्यवृत्ती नसती तर कदाचित उच्च शिक्षण पूर्ण करणे शक्य झाले नसते. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणासाठी निर्माण केलेल्या घटनात्मक संधी आणि सामाजिक न्यायाच्या विचारांबद्दल त्यांना विशेष आदर आहे. वडिलांनी दिलेला सर्वात मोठा वारसा म्हणजे संपत्ती नव्हे, तर जिद्द, प्रामाणिकपणा आणि संकटात न डगमगण्याची ताकद. आयुष्यभर कष्ट करून त्यांनी मुलांना एकच धडा दिला ङ्गपरिस्थिती कितीही कठीण असली तरी शिक्षण सोडायचे नाही. हाच धडा पुढे प्रणाली दहाटे यांच्या संपूर्ण आयुष्याचा आधारस्तंभ ठरला.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी पॉलिटेक्निकमध्ये व्याख्याता म्हणून अध्यापन सुरू केले. अध्यापनाबरोबरच त्यांनी स्पर्धा परीक्षांची तयारीही सुरू ठेवली. लग्नानंतर अनेकांची स्वप्ने बदलतात पण त्यांनी स्वप्नांचा पाठलाग सोडला नाही. २०१४ मध्ये त्यांनी शासकीय पॉलिटेक्निक व्याख्याता आणि आयटीआय प्राचार्य पदांच्या परीक्षा दिल्या आणि दोन्ही परीक्षांमध्ये यश मिळवले. मात्र नियतीने त्यांची खरी परीक्षा अजून बाकी ठेवली होती. २०१५ मध्ये व्याख्याता पदाच्या मुलाखतीसाठी त्यांना मुंबईला बोलावण्यात आले. त्या वेळी गर्भारपणाचा आठवा महिना सुरू



होता. डॉक्टरांचा सल्ला, घरच्यांची काळजी आणि प्रवासाचा धोका यामुळे त्यांनी मनावर दगड ठेवून आपल्या स्वप्नातील संधीचा त्याग केला. एखाद्याला वाटेल, इतके कष्ट करूनही नशिबाने साथ दिली नाही, पण संघर्षाला घाबरणाऱ्या त्या नव्हत्या.

प्रसूतीनंतर काही दिवसांतच पुन्हा दुसऱ्या मुलाखतीसाठी बोलावणे आले. नुकतीच गंभीर प्रसूती झालेली, अंगात ताप, नीट चालताही येत नव्हते आणि कुशीत अवघे वीस दिवसांचे बाळ. अशा वेळी अनेकांनी आता नको असेच सांगितले असते. परंतु त्यांचे पती त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले. त्यांनी धैर्य दिले, विश्वास दिला आणि 'तू हा इंटरव्ह्यू देणारच' असा आग्रह धरला. त्या मुंबईला गेल्या, मुलाखत दिली आणि उपस्थित सर्वांना त्यांच्या जिद्दीने प्रभावित केले. निकाल काय लागेल, याची खात्री नव्हती, पण प्रयत्न मात्र अपूर्ण राहिला नाही. काही काळानंतर नियुक्ती आदेश आला आणि त्यांच्या संघर्षाला यशाचे सुंदर बक्षीस मिळाले. त्यांचा मुलगा तेव्हा दोन वर्षांचा झाला होता. त्याचे नाव त्यांनी 'कौतुक' ठेवले, कारण तो त्यांच्या आयुष्यातील संघर्ष, आशा आणि यशाचा साक्षीदार होता. २०१७ मध्ये त्या चंद्रपूर येथील मुलींच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्राचार्य (गट-ब) म्हणून रुजू झाल्या. शासकीय सेवा ही केवळ पद नसते तर ती सतत शिकण्याची आणि जबाबदाऱ्या स्वीकारण्याची प्रक्रिया असते. अनेक प्रशासकीय अडचणी, मर्यादा आणि आव्हाने आली पण त्यांनी प्रत्येक प्रश्नाकडे समस्येऐवजी संधी म्हणून पाहिले. संस्थेची गुणवत्ता, विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, शिक्षकांचे समन्वय आणि प्रशासनातील पारदर्शकता यांना त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले. आठ वर्षांच्या यशस्वी सेवेनंतर त्यांना वर्ग-१ अधिकारी म्हणून पदोन्नती मिळाली आणि साकोली येथे प्राचार्या म्हणून नवीन जबाबदारी स्वीकारण्याची संधी मिळाली. आज त्या विभागात कर्तव्यदक्ष, निर्णयक्षम आणि विद्यार्थीकेंद्रित अधिकारी म्हणून ओळखल्या जातात. कौशल्य विकास ही केवळ सरकारी योजना नसून युवकांच्या भविष्याचा पाया आहे, या विश्वासाने त्या सातत्याने कार्यरत आहेत. आज देशाला रोजगारक्षम, प्रशिक्षित आणि आत्मनिर्भर युवकांची गरज आहे. उद्योगांना कुशल मनुष्यबळ हवे आहे. अशा वेळी आयटीआयसारख्या संस्था राष्ट्रनिर्मितीचे केंद्र बनतात. त्या संस्थांचे नेतृत्व करणारे अधिकारी म्हणजे भविष्यातील भारत घडवणारे शिल्पकार असतात. प्रणाली दहाटे यांचे कार्य या व्यापक राष्ट्रीय ध्येयाशी जोडलेले आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा गुण म्हणजे साधेपणा. पद वाढले, जबाबदाऱ्या वाढल्या, परंतु पाय मात्र जमिनीवरच राहिले. विद्यार्थ्यांशी संवाद, सहकाऱ्यांशी सुसंवाद, कामातील शिस्त आणि निर्णयातील पारदर्शकता यामुळे त्यांनी विश्वासार्ह अधिकारी म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांचा संपूर्ण जीवनप्रवास एक महत्त्वाचा संदेश देतो की, ङ्गगरिबी अडथळा असू शकते पण ती यशाचा अंत नसते. योग्य संधी, शिक्षण, जिद्द आणि कुटुंबाचा विश्वास असेल तर कोणतीही मुलगी उच्च पदापर्यंत पोहोचू शकते.ङ्गप्रशासकीय जबाबदाऱ्यांमुळे सामाजिक कार्यात सातत्याने सक्रिय राहणे शक्य होत नसले, तरी त्यांना आंबेडकरी विचारांची मांडणी करणाऱ्या 'कोण म्हणतो टक्का दिला?' या नाटकात अभिनय करून वैचारिक चळवळीचा एक छोटासा भाग होण्याचे भाग्य लाभले. चंद्रपूर येथे या नाटकाचे काही यशस्वी प्रयोगही झाले. समाजप्रबोधनाच्या अशा सांस्कृतिक माध्यमातून योगदान देता आले, ही त्यांच्या करिता कायमची समाधानाची बाब आहे. आज समाजात मुलींच्या शिक्षणाबद्दल बोलले जाते, परंतु प्रणाली दहाटे यांचा प्रवास हे त्या विचाराचे जिवंत उदाहरण आहे. संघर्ष हा त्यांच्या आयुष्याचा अध्याय होता, शिक्षण त्यांची ताकद होती, जिद्द त्यांची ओळख ठरली आणि कर्तव्यनिष्ठा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी सही बनली. शिष्यवृत्तीवर शिक्षण घेणारी एक विद्यार्थीनी पुढे वर्ग-१ अधिकारी बनते, हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्याची जबाबदारी स्वीकारते आणि कौशल्य विकासाच्या माध्यमातून राष्ट्रनिर्मितीत योगदान देते. यापेक्षा प्रेरणादायी प्रवास कोणता? ११ जुलैच्या वाढदिवसानिमित्त त्यांना हार्दिक शुभेच्छा! त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, अखंड कार्यऊर्जा आणि अधिक व्यापक यश लाभो. त्यांच्या नेतृत्वाखाली आणखी अनेक विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना नवी दिशा मिळो, अनेक कुटुंबांचे भविष्य उजळो आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तनाची ही वाटचाल अधिक वेगाने पुढे जावो, हीच मनःपूर्वक सदिच्छा.

**– प्रवीण बागडे**
**नागपूर**

# राज्य शासनाची कर्जमुक्ती : शाश्वत कृषी विकासाचे धोरण

**शेती** ही महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून राज्यातील लाखो कुटुंबांच्या उपजीविकेचा मुख्य आधार आहे. मात्र, हवामानातील अनिश्चितता, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, वाढता उत्पादन खर्च, बाजारपेठेतील चढ-उतार आणि कर्जाचा वाढता बोजा यामुळे अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडतात. अशा परिस्थितीत केवळ तात्पुरता दिलासा देणे पुरेसे नसून शेतकरी पुन्हा आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल, उत्पादनक्षम बनेल आणि भविष्यात कर्जाच्या दुष्टचक्रात अडकणार नाही, अशी दीर्घकालीन व्यवस्था उभी करणे आवश्यक ठरते.

याच व्यापक दृष्टिकोनातून राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' राबविण्याचा निर्णय घेतला आहे. सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ देणारी आणि सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांची ही योजना केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित नसून शाश्वत कृषी विकासाच्या व्यापक धोरणाचा महत्त्वाचा भाग म्हणून पाहिली जात आहे.

कर्जमुक्तीचा मूलभूत उद्देश शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देणे हा असला, तरी त्यामागील व्यापक विचार अधिक महत्त्वाचा आहे. कर्जमुक्त झालेला शेतकरी पुन्हा पतपुरवठ्यास पात्र होतो. नव्याने पीककर्ज उपलब्ध झाल्यामुळे तो वेळेवर बियाणे, खते, औषधे आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर करू शकतो. यामुळे उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होते आणि शेती अधिक सक्षम बनते.

या योजनेतील सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे विविध प्रकारच्या शेतकऱ्यांचा विचार करण्यात आला आहे. दोन लाख रुपयांपर्यंतची थकीत कर्जे असलेल्या पात्र शेतकऱ्यांना थेट कर्जमुक्ती दिली जात आहे. त्याचबरोबर दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठी एकवेळ समझोता (One Time Settlement - OTS) योजना उपलब्ध करून देण्यात आली आहे. अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर अशा शेतकऱ्यांनाही कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे मोठ्या कर्जबाजारी शेतकऱ्यांनाही आर्थिक पुनरुज्जीवनाची संधी उपलब्ध झाली आहे.

शासनाने नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचाही विशेष विचार केला आहे. त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे आर्थिक शिस्त, वेळेवर कर्जफेड आणि बँकिंग व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होण्यास मदत होईल. ही बाब शाश्वत वित्तीय व्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

योजनेची संपूर्ण अंमलबजावणी डिजिटल माध्यमातून केली जात आहे. महाआयटीच्या प्रणालीद्वारे आधार प्रमाणीकरण, ऑनलाइन पडताळणी, बँकांची संगणकीय माहिती आणि थेट लाभ वितरणामुळे प्रक्रिया अधिक पारदर्शक, वेगवान आणि विश्वासार्ह झाली आहे. लाभार्थ्यांच्या याद्या ग्रामपंचायत, बँका, विकास संस्था आणि आपले सरकार सेवा केंद्रांमध्ये प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. मोबाईल संदेशाद्वारे लाभार्थ्यांना माहिती देण्याची तसेच तक्रार निवारणाची स्वतंत्र यंत्रणाही उभारण्यात आली आहे. यामुळे प्रशासनातील पारदर्शकता आणि लोकांचा विश्वास अधिक बळकट होईल. शाश्वत कृषी विकासाचा विचार केवळ कर्जमुक्तीपर्यंत मर्यादित राहत नाही.

राज्य शासनाचे उद्दिष्ट शेतकऱ्यांना बारमाही सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून देणे, शेतीमालावर आधारित उद्योग-व्यवसायांना चालना देणे, कृषी प्रक्रिया उद्योगांचा विस्तार करणे, शेतीमालाला योग्य बाजारभाव मिळवून देणे, तातडीच्या पणन व्यवस्था विकसित करणे, वेळेवर पतपुरवठा सुनिश्चित करणे आणि ग्रामीण भागात आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे हे आहे. या सर्व बाबी परस्परपूरक असून त्यांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास आणि शेती अधिक लाभदायक होण्यास मदत होईल. सिंचनाचा विस्तार झाल्यास पावसावरील अवलंबित्व कमी होईल. आधुनिक तंत्रज्ञान, सूक्ष्म सिंचन, जलसंधारण आणि पीक नियोजन यामुळे उत्पादनात वाढ होईल. प्रक्रिया उद्योग उभारल्यास शेतीमालाला मूल्यवर्धन मिळेल आणि ग्रामीण भागात रोजगारनिर्मितीला चालना मिळेल. सक्षम पणन व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळण्यास मदत होईल. या सर्व घटकांची सांगड कर्जमुक्तीशी घालण्यात आल्याने ही योजना शाश्वत कृषी विकासाच्या व्यापक आराखड्याचा भाग ठरते.

आजच्या काळात हवामान बदल हे शेतीसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या सक्षम, तांत्रिकदृष्ट्या आधुनिक आणि बाजारपेठेशी जोडलेला शेतकरी निर्माण करणे ही काळाची गरज आहे. कर्जमुक्तीमुळे निर्माण होणारे आर्थिक स्थैर्य, वेळेवर मिळणारा पतपुरवठा, आधुनिक शेती पद्धतींचा स्वीकार आणि मजबूत कृषी पायाभूत सुविधा या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे अधिक शाश्वत, सक्षम आणि स्पर्धात्मक कृषी व्यवस्था होय. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' ही त्यामुळे केवळ कर्जमाफीची योजना नाही. ती शेतकऱ्याला नव्याने उभारी देणारी, आर्थिक विश्वास पुनर्स्थापित करणारी, डिजिटल सुशासनाला चालना देणारी आणि कृषी क्षेत्राच्या दीर्घकालीन शाश्वत विकासाला दिशा देणारी महत्त्वपूर्ण योजना आहे. आर्थिक दिलासा, पतपुरवठा, सिंचन, आधुनिक तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योग, बाजारपेठ आणि पायाभूत सुविधांचा समन्वय साधून शेतकऱ्यांचे जीवन अधिक सुखी, समृद्ध आणि आत्मनिर्भर करण्याच्या राज्य शासनाच्या व्यापक धोरणातील हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

**– प्रवीण टाके**
उपसंचालक,विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर

# !!! प्रेमवेलीवर फुललेले फूल प्राणपणाने जपा कीहोऽऽऽऽ..!!!

**(प्रेमवीरांचे पळून प्रेमविवाह विशेष.)**

आजही भारतातील अनेक राज्यात प्रेमविवाहांना खुल्या मनाने स्विकार केला जात नाही. भारतात अशी अनेक कुटुंबे आहेत, जिथे आजही प्रेमविवाहास परवानगी नाहीये. अशा परिस्थितीत कुटुंबातील कोणत्या सदस्याला प्रेम झालं तर ती त्याच्यासाठी एक मोठी समस्या बनते. त्यामुळे कुटुंबीयांची परवानगी मिळवण्यासाठी येथील काही टिप्स कामी येऊ शकतात. सदर मार्गदर्शक संकलित लेख श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींनी खास प्रेमवीरांना समर्पित केलाय... संपादक.

आपल्या देशात ० ते १९ वर्षांपर्यंत-जन्मापासून तर लग्नांपर्यंत आईवडील आपल्या मुलांमुलीचा जीवापाड सांभाळ करतात. त्यांना सरळ-चांगले चालणे-बोलणे, उठणे-बसणे, लिहिणे-वाचणे शिकवितात. त्यांच्यावर सुसंस्काराची उधळण करतात. एवढेच का? तर आपली मुले कुठेही मागे राहू नयेत. ती जागतिक स्पर्धेत सरस ठरावीत, त्यांच्याबद्दल कटू व बदनामीकारक शब्द ऐकू येऊ नयेत. म्हणून स्वतः ज्या चाकोरीबद्ध मर्यादेत वावरत असतात, त्याच मर्यादापूर्ण चाकोरीत वागण्यास मुलांनाही बाध्य करीत असतात. आपल्या वंगाळ व विपरीत वागणुकीने आपला आदर्श परिवार, समाज, धर्म किंवा संप्रदाय कलंकित होऊ नये. म्हणून ते कडक शिस्त लावतात. मुलांना त्यांच्या या कडक शिस्तीचाच विट येतो. कारण त्यांना स्वैर, स्वतंत्र व स्वच्छंदीवृत्तीने विनानिर्बंध वागावेसे वाटते. म्हणून ते परस्परांच्या यौनसौंदर्यावर भाळून घर सोडून घरांपासून दूर पळून जातात. त्यांना ती शिस्त व मर्यादा खूप कटकटीची व कष्टप्राय वाटल्यानेच ते असे टोकाचे पाऊल उचलतात. जगाच्या पाठीवर कोठेही पळून गेले तरी ती ब्याद काही पाठलाग सोडत नाही, हे त्यांना नंतर हळुहळू कळू लागते. ते अविचाराने व मोठ्या हिंमतीने घरून निघून जाऊ लागतात, तेव्हा भ्रम झालेला असतो की आपण कोणाच्याही मदती, सहकार्य, किंवा आधाराशिवाय सहज जगू शकतो. म्हणून ते आईवडिलाना किंवा नातलगांना न पुसता, न विचारता लग्न करतात आणि प्रपंचाच्या काटेरी पिंजऱ्यात आकंठ अडकतात. पुढे अशा आईवडिलांच्या उपकाराची, संस्काराची जाण नसलेल्या मुलांना या प्रपंचाचा काटेरी पाश सोसवत नाही आणि काही दिवसातच ते एकामेकांचा काडिमोड करून प्रेमवेलीवर फुललेले फूलही रस्त्यावर टाकून देतात. अरेरे! हे काय तुमचे माणुसकीचे जगणे झाले का? बाळांनो, जरा विचारा स्वतःलाच.

आजही भारतातील अनेक राज्यात प्रेमविवाहांना खुल्या मनाने स्विकार केला जात नाही. भारतात अशी अनेक कुटुंबे आहेत, जिथे आजही प्रेमविवाहास परवानगी नाहीये. अशा परिस्थितीत कुटुंबातील कोणत्या सदस्याला प्रेम झालं तर ती त्याच्यासाठी एक मोठी समस्या बनते. त्यामुळे कुटुंबीयांची परवानगी मिळवण्यासाठी काही टिप्स कामी येऊ शकतात. जसजशी वेळ बदलत गेली तसतसे भारतीय संस्कृतीत लग्न या विषयामध्ये अनेक बदल होत गेले. आताच्या काळात प्रेमविवाह किंवा अरेंज्ड मॅरेज दोन्हीही अगदी सामान्य झाले आहेत. पण तरीही आज अशी बरीच कुटुंबे आहेत जिथे प्रेमविवाह करण्यास परवानगी नाहीये. जर तुमच्या घरातही असे काही नियम असतील आणि तुम्ही मात्र नकळत कोणाच्या प्रेमात पडला असाल; पण तुम्हाला आई-वडिलांच्या आशीर्वादानेच लग्न करायचे असेल तर या काही खास टिप्स तुमच्या नक्की कामी येतील. या टिप्स वापरुन तुम्ही आपल्या जोडीदाराची माहिती आई-वडिलांना देऊ शकता व त्यांची परवानगी मिळवू शकता.

योग्य वेळेची निवड: जर तुम्हाला आधीच माहित असेल की ते लग्नाला विरोध करणार तर मात्र तुम्ही योग्य वेळ बघूनच हा विषय त्यांच्यासमोर काढणे उत्तम! अशा वेळेची वाट बघा जेव्हा घरातील वातावरण टेन्शन फ्री असेल आणि आई-वडिलांचा मुड देखील खूप चांगला असेल. अशी योग्य वेळ हाती लागताच बोलता बोलता त्यांना सांगा की तुम्हाला कोणीतरी आवडते आणि त्या व्यक्तीसोबतच तुम्हाला आयुष्य व्यतीत करायचे आहे.

मदत घ्या: आई-वडिलांना आपल्या प्रेमाबद्दल काही सांगण्याआधी एखाद्या अशा नातेवाईकाची मदत घ्या, ज्याचा आई-वडील खूप आदर करत असतील किंवा त्यांच्या शब्दाला घरात मान असेल. त्यांच्यासोबत मिळून ठरवा की हा विषय कसा तुम्ही आई-वडिलांसमोर मांडू शकता आणि कशी त्यांची परवानगी चुटकीसरशी मिळवू शकता. तसेच आई-वडिलांशी बोलायला जाताना या नातेवाईकालाही सोबत जरुर घेऊन जा. जेणे करुन परिस्थिती हाताबाहेर गेली अथवा पालक चिडले तर तो नातेवाईक सर्व परिस्थिती चलाखीने हाताळेल.

स्वत:ला परिपक्व सिद्ध करा: हा मुद्दा सर्वात जास्त महत्वाचा असतो. कारण जर आईवडिलांना आपला मुलगा किंवा मुलगी स्वत:च्या आयुष्याचे निर्णय घेण्यास सक्षम आहेत, असं वाटत नसेल तर ते कधीच तुम्ही घेतलेल्या निर्णयास दुजोरा देणार नाहीत. म्हणूनच आईवडिलांचा विश्वास जिंकून त्यांना हे पटवून द्या, की तुम्ही स्वत:चे निर्णय स्वत: घेण्यास समर्थ असून तुम्ही एक परिपक्व व्यक्ती आहात. त्यामुळे तुम्ही लग्नासारखा निर्णय पूर्णत्वास नेऊ शकता. तरच ते तुमचे बोलणे गांभिर्याने घेतील.

जोडीदाराची खासियत सांगा: जोडीदाराविषयी सर्व माहिती आपल्या आई-वडिलांना सांगा. करियर, नोकरीपासून तुमच्या कुटुंबासाठी ती व्यक्ती कशी योग्य आहे, हे त्यांना पटवून द्या. तसेच कधी कोणत्या संकट काळात तुमच्या जोडीदाराने तुमची सर्वोत्तम काळजी घेत साथ दिली असेल, तुम्हाला सावरले असेल, तर ते देखील आवर्जुन सांगा. कारण यामुळे आईवडिलांनाही खात्री पटेल, की तुम्ही पसंत केलेली व्यक्ती भविष्यात तुमची व्यवस्थित काळजी घेऊ शकते.

संयम ठेवा: तुम्ही सांगताक्षणी तुमचे पालक लग्नासाठी सहमती देतील, असं अजिबात नाही. त्यामुळे अशावेळी संयम ठेवणे अतिशय गरजेचं आहे. जरी त्यांनी लग्नाला नकार दिला, तरी तुम्ही शांत राहा आणि वेळोवेळी त्यांचं मत बदलले आहे का? याचा अंदाज घेण्याचा प्रयत्न करा. पण जर तुम्ही आततायीपणे आपला राग दाखवला तर आई-वडील लग्नासाठी तयार होतील देखील पण लग्नानंतर तुमच्या जोडीदाराला स्वीकारणे त्यांच्यासाठी कठीण होऊन बसेल. लग्नाच्या मंगलाष्टकातील 'सावधान!' शब्द प्रपंचात प्रवेश करतांना खरेच दक्षतेचा संकेत देतो, हे विसरून कसे चालेल, नाही का?

यात त्यांच्या मायबापांचा काहीच दोष नाही, असेही पूर्णपणे म्हणता येणार नाही. काही अंशी तरी त्यांचाही येथे दोष आहेच. आपण पुत्र-पुत्रीचे बालपणीचे रुसणे-फुगणे सावरले, त्यांचे बालहट्ट पुरविले. तसेच काहीसे कलेकलेने घेतले असते, माणुसकीच्या नात्याने त्यांना समजून जवळ केले असते; तर आज ही अशी पुत्र-पुत्री वियोगाची वेळच आली नसती. मायबाप हाच खरा घरपरिवार, समाज, धर्म, आणि संप्रदायांतील महत्वाचा दुवा आहे. त्यामुळे आपोआपच बदनामीला खिळ बसली असती. आपल्या उपस्थितीत आणि आशीर्वादामुळे त्यांचे प्रेमविवाह अधिकच यशस्वी व शोभायमान ठरले असते, एवढे मात्र खरे हं! !! प्रेमविवाहाच्या सर्व प्रेमवीरांना 'सावधान' होण्यास्तव हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.**
गडचिरोली, जि. गडचिरोली.
फक्त व्हाट्स ॲप-
९४२३७१४८८३.

# संभाजीनगरच्या सकल गोरबंजारा एस टी आरक्षण मेळाव्यात बहुसंख्येने उपस्थित राहा. - प्रा. संदेश चव्हाण

छत्रपती संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी) - महाराष्ट्रातील सकल गोरबंजारा समाजाने पुन्हा एकटा गोरबंजारा समाजाला एस टी आरक्षण मिळावे यासाठी कंबर कसली आहे, संभाजीनगर येथे दि.१२ जुलै रोजी गोरबंजारा समाजाचा एस टी आरक्षण राज्यस्तरीय मेळावा पार पडणार आहे. या मेळाव्यात महाराष्ट्रतील गोरबंजारा समाजातील सर्व संघटना एकवटणार असून या मेळाव्यात समाजबांधवांनी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन या मेळाव्याचे निमंत्रक तथा गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. संदेश चव्हाण यांनी केले आहे.




गोर बंजारा समाजाची आदीम लक्षणे बघता आदीवासी आरक्षणाच्या सवलती मिळाव्यात यासाठी गोरबंजारा समाजाने अनेक लढे उभारल आहे गेल्यावर्षी महाराष्ट्रतील अनेक जिल्ह्यात किमान ५६ महामोर्चे लाखोच्या संख्येने निघाले. पाच जणानी आत्मबलिदान दिले. जवळपास १५ लोकांनी आमरण उपोषण केले, गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संदेश चव्हाण यांनी समृद्धी महामार्गावर हजारो गोरसैनिक उतरवून रास्ता रोको केला.

रेल्वे रोकोची हाक देताच सरकारनी चर्चा करण्यासठी गोरबंजारा समाजातील शिष्टमंडळासोबत सविस्तर चर्चा करून समिति नेमण्याचे आश्वासन दिले मात्र समिति कागदोपत्रीच सिमित राहिली त्यासाठी गोरसेनेचे वतीन न्या. तहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या अभ्यास समितीने आजपर्यंत काय केले यांचा अहवाल मागीतला मात्र सरकारला याचे उत्तर देता आले नाही म्हणून सुस्त सरकारला जागे करण्यासाठी गोरबंजारा आरक्षण कृती समितीच्या वतीने समाजातील सर्व संघटना मिळून येत्या रविवारी १२ जुलै रोजी संभाजीनगर येथील एम आय टी परीसरातील मंथन हॉल येथे सकाळी ११ वाजता गोरबंजारा एस टी आरक्षण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या मेळाव्यात पोरीयागडचे पूजनीय कबीर महाराज, तेलंगणाचे खा. पोरिका बलराम नायक, मा आ. राजेश राठोड, उद्योजक जयसिंग राठोड, मा. आ. निलय नायक नीयकंळ शशीकला राठोड, आरक्षण अभ्यासक मोहन चव्हाण, निवृत्त माहिती संचालक मोहन राठोड, माजी न्यायाधीश अँड सुभाषचंद्र राठोड, राष्ट्रीय समन्वयक डिगंबर राठोड शिंपलताई राठोड टिसी राठोड. प्रा डॉ. अनिल राठोड, आकाश जाधव, डॉ. अभय जाधव इंजि. रामलू नायक सह अनेक मान्यवर उपस्थित राहून संबोधीत करणार आहे. तरी या आरक्षण महामेळाव्यात गोरबंजारा समाजातील समाजबांधवांनी बहसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन या महामेळाव्याचे निमंत्रक तथा गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांनी केले आहे.

# प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलैपर्यंत मुदत; शेतकऱ्यांनी संधीचा लाभ घ्यावा

छत्रपती संभाजीनगर, दि. ११ (प्रतिनिधी) - नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, पूर, दुष्काळ, वादळ तसेच इतर प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे होणारे नुकसान लक्षात घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्यासाठी राज्य शासनाने खरीप हंगाम २०२६-२७ साठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविली आहे.
या योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलै २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली असून, पात्र शेतकऱ्यांनी वेळेत नोंदणी करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी कर्जदार आणि बिगर कर्जदार अशा दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांना स्वेच्छेने सहभागी होता येणार आहे. मात्र, यासाठी AGRISTACK Farmer ID असणे तसेच डिजिटल पीक सर्वेक्षण (Digital Crop Survey - DCS) अंतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक करण्यात आले आहे. भाडेतत्त्वावर शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनी नोंदणीकृत भाडेकराराची माहिती पीक विमा संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक राहील.

योजनेत सहभागी होण्यासाठी प्रति अर्ज किमान ०.१० हेक्टर क्षेत्राची अट ठेवण्यात आली आहे. विमा हप्ता म्हणून खरीप हंगामातील पिकांसाठी शेतकऱ्यांना केवळ दोन टक्के, रब्बी पिकांसाठी दीड टक्का, तर नगदी पिकांसाठी पाच टक्के हिस्सा भरावा लागणार आहे.

उर्वरित विमा प्रीमियम शासनाकडून भरला जाणार आहे. खरीप हंगामात पेरणीनंतर काढणीपर्यंतच्या कालावधीत नैसर्गिक आपत्ती किंवा प्रतिकूल परिस्थितीमुळे उत्पादनात घट झाल्यास पीक कापणी प्रयोग अथवा तांत्रिक उत्पादन मूल्यांकनाच्या आधारे नुकसानभरपाई दिली जाईल. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळून शेती व्यवसायातील जोखीम कमी होण्यास मदत होणार आहे.
शासनाने योजनेच्या अंमलबजावणीत पारदर्शकता आणण्यासाठी काही महत्त्वाच्या अटी लागू केल्या आहेत. चुकीची माहिती देऊन अथवा फसवणुकीच्या उद्देशाने विमा घेतल्याचे आढळल्यास संबंधित शेतकऱ्याला पीक विमा योजनेसह कृषी विभागाच्या विविध डीबीटी योजनांपासून पाच वर्षांसाठी अपात्र ठरविण्यात येणार आहे.

योजनेसाठी अर्ज करताना जमिनीची कागदपत्रे, पीक लागवड घोषणापत्र, आधार क्रमांक, आधारशी संलग्न बँक खाते तसेच AGRISTACK Farmer ID आदी कागदपत्रे आवश्यक आहेत. विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयाने सर्व पात्र शेतकऱ्यांना अंतिम मुदतीची वाट न पाहता ३१ जुलैपूर्वीच अर्ज सादर करून सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# रश्मिका मंदानाने 'मैसा'साठी भारतातील पहिला महिला - प्रमुख अंडरवॉटर फायट सिक्वेन्स केला शूट



'मैसा' हा महिला-प्रमुख पॅन-इंडिया ॲक्शनपट असून, यात रश्मिका मंदाना तिच्या कारकिर्दीतील सर्वात दमदार आणि निर्भीड भूमिकेत दिसणार आहे. चित्रपटाच्या निर्मात्यांनी नुकतेच चित्रपटातील सर्वात मोठ्या आणि महत्त्वाकांक्षी ॲक्शन सिक्वेन्सपैकी एकाचे चित्रीकरण पूर्ण केले आहे. विशेष म्हणजे, हा भारतातील पहिलाच महिला-प्रमुख अंडरवॉटर फायट सिक्वेन्स आहे!

'मैसा' हा २०२६ मधील सर्वाधिक प्रतीक्षित चित्रपटांपैकी एक ठरला आहे. या पॅन-इंडिया चित्रपटात रश्मिका मंदाना मुख्य भूमिकेत झळकणार असून, आपल्या वेगवेगळ्या भूमिकांमुळे आणि दमदार स्क्रीन प्रेझेन्समुळे ओळखली जाणारी रश्मिका या चित्रपटात याआधी कधीही न पाहिलेल्या अवतारात दिसणार आहे. तिचा हा नवा आणि जबरदस्त लूक, तसेच चित्रपटाची वेगळी संकल्पना यामुळे प्रेक्षकांची उत्सुकता दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे निर्मात्यांकडून येणारे प्रत्येक अपडेट चर्चेचा विषय ठरत आहे.

चित्रपटाबद्दल आधीच प्रचंड उत्सुकता असताना आता समोर आलेले नवे अपडेट स्वतःमध्ये एक विक्रम ठरणारे आहे. रश्मिकाने या चित्रपटासाठी भारतातील पहिला महिला-प्रमुख अंडरवॉटर ॲक्शन सिक्वेन्स शूट केला आहे. होय, रश्मिकाने हा अंडरवॉटर फायट सिक्वेन्स कोणत्याही ॲक्शन डबलशिवाय स्वतः पूर्ण केला आहे. हा सिक्वेन्स पूर्ण करण्यासाठी तिने दोन दिवसांत तब्बल २० तास पाण्याखाली घालवले. तिची मेहनत आणि समर्पण पाहून सेटवरील प्रत्येकजण थक्क झाला. इतकेच नव्हे तर अंडरवॉटर टेक्निकल टीम आणि डीओपी यांनीही भारतीय चित्रपटसृष्टीत याआधी असा परफॉर्मन्स कधीच पाहिला नसल्याचे सांगितले.

हा सिक्वेन्स आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या आणि महत्त्वाकांक्षी ॲक्शन सिक्वेन्सपैकी एक मानला जात असून, भारतीय सिनेमात तो चर्चेचा मोठा विषय ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. निर्मात्यांनी त्यांच्या सोशल मीडियावर या खास ॲक्शन सिक्वेन्सची एक झलक आणि सेटवरील रश्मिकाचे काही फोटो शेअर करत कॅप्शनमध्ये लिहिले - तिच्यासाठी पृष्ठभाग ही कधीच मर्यादा नव्हती. समुद्राच्या अथांग गाभाऱ्यात भारतीय सिनेमाने याआधी कधीही न पाहिलेली एक लढाई दडलेली आहे. या वादळी अवतारासाठी सज्ज व्हा.'

तसेच दुसऱ्या पोस्टमध्ये त्यांनी लिहिले - 'ॲक्शन सिनेमाचा एक नवा अध्याय सुरू झाला आहे.

टीम MYSAA ने भारतातील पहिल्या महिला-प्रमुख अंडरवॉटर फायट सिक्वेन्सचे चित्रीकरण यशस्वीरीत्या पूर्ण केले असून, यात निर्भीड RashmikaMandanna पाहायला मिळणार आहे. भारतीय सिनेमात नवी लाट निर्माण करणाऱ्या या दमदार आणि अनोख्या ॲक्शन स्पेक्टॅकलसाठी सज्ज व्हा. टीझरची घोषणा लवकरच.

२०२६ मध्ये चित्रपटगृहांत. यासोबतच रश्मिकानेही तिच्या सोशल मीडियावर हा अपडेट शेअर करत लिहिले -

'मला माहिती आहे की मी बऱ्याच दिवसांपासून गायब होते... पण आम्ही याच कामात व्यस्त होतो. हे माझ्या आयुष्यातील आजपर्यंतचे सर्वात आव्हानात्मक काम ठरले आहे! आम्ही यासाठी अक्षरशः वेडे आहोत... पण हीच गोष्ट मला सर्वाधिक उत्साहित करते! चला, सुरुवात करूया! अनफॉर्म्युला फिल्म्सची निर्मिती आणि रवींद्र पुल्ले यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेला 'मैसा' हा आदिवासी भागांवरील कथानकावर आधारित भावनिक ॲक्शन थ्रिलर आहे. दमदार व्हिज्युअल्स, उत्कंठावर्धक कथा आणि रश्मिका मंदानाचा संस्मरणीय अभिनय यामुळे हा चित्रपट प्रेक्षकांच्या कायम स्मरणात राहील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
**: संपादक :**
**राजेंद्र पांडुरंग रांजणीकर**
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# छत्रपती संभाजीनगर पॅटर्न! : शहर स्वच्छतेसाठी आयुक्त अमोल येडगे स्वतः मैदानात, दोन दिवसांत 1 लाखांचा दंड वसूल

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- शहरातील घनकचरा व्यवस्थापनाला नवसंजीवनी देण्यासाठी आणि स्वच्छतेचा नवा आदर्श निर्माण करण्यासाठी महानगरपालिकेने एक क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या कल्पकतेतून शहरात विशेष संयुक्त पाहणी पथकांची नियुक्ती करण्यात आली असून, स्वतः आयुक्त या मोहिमेसाठी रात्रीच्या वेळी थेट रस्त्यावर उतरले आहेत. हा अभिनव छत्रपती संभाजीनगर पॅटर्न यशस्वी झाल्यास देशातील कचरा व्यवस्थापनासाठी तो एक उत्तम रोल मॉडेल ठरेल, असा विश्वास आता व्यक्त केला जात आहे. या धडक मोहिमेसाठी शहराच्या कानाकोपऱ्यात लक्ष ठेवण्यासाठी २९ विशेष पथके सज्ज करण्यात आली असून, या प्रत्येक टीममध्ये स्वच्छता निरीक्षक, नागरिक मित्र पथकाचे कर्मचारी, आय.ई.सी. सुपरवायझर आणि वेईकल सुपरवायझर यांचा समावेश आहे. ही पथके दर सोमवार आणि गुरुवारी सायंकाळी ६.०० ते रात्री ९.०० या वेळेत शहरातील मुख्य बाजारपेठा, हॉटेल्स, दुकाने आणि पानटपऱ्यांची अचानक पाहणी करणार आहेत.

या मोहिमेदरम्यान दुकानासमोरील परिसर स्वच्छ आहे की नाही, ओला-सुका कचरा वेगवेगळ्या डस्टबीनमध्ये ठेवून तो घंटागाडीतच टाकला जातोय का, आणि प्रतिबंधित सिंगल-युज प्लास्टिकचा वापर पूर्णपणे बंद आहे का, या बाबींवर या पथकांचे बारीक लक्ष असणार आहे. मोहिमेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे स्वतः आयुक्त अमोल येडगे रात्रीच्या वेळी शहरात फिरून परिस्थितीचा आढावा घेत आहेत. रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या नागरिकांना त्यांनी जागेवरच दंडात्मक दणका दिला आहे, तसेच कामात हलगर्जीपणा आणि निष्काळजीपणा दाखवणाऱ्या महापालिका कर्मचाऱ्यांवरही आयुक्तांनी तात्काळ कारवाईचा बडगा उगारला आहे. या संपूर्ण मोहिमेच्या नियंत्रणाची धुरा उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन नंदकिशोर भोंबे यांचेकडे आहे.संयुक्त पथके रस्त्यावर उतरताच नियम मोडणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, सोमवार आणि गुरुवार अशा अवघ्या दोन दिवसांत प्रशासनाने तब्बल १ लाख रुपयांचा दंड वसूल केला आहे. यामध्ये प्रामुख्याने गुलमंडी, पैठण गेट, सिटी चौक, टीव्ही सेंटर, सेंट्रल नाका, चिश्तिया चौक या प्रमुख बाजारपेठांसह १३ व्यावसायिक प्रभागांवर मोठी दंडात्मक कारवाई करण्यात आली. एकाच दिवशी १३ प्रभागांमधून ३८ हजार रुपये वसूल करण्यात आले, ज्यामध्ये प्रभाग ५ आणि प्रभाग १५ मध्ये सर्वाधिक प्रत्येकी ६,००० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.



या मोहिमेविषयी बोलताना मनपा आयुक्त श्री. अमोल येडगे म्हणाले की, ''छत्रपती संभाजीनगर शहराला स्वच्छतेत देशात अग्रस्थानी नेण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. केवळ कायदे करून किंवा कर्मचाऱ्यांवर विसंबून न राहता, व्यावसायिक आणि नागरिकांचा सहभाग यात महत्त्वाचा आहे. पहिल्या टप्प्यात आम्ही जनजागृती आणि सूचनांवर भर देऊ, पण नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक दंडात्मक कारवाई देखील केली जाईल.''

दुसरीकडे, स्थानिक व्यापारी संघटनेच्या प्रतिनिधींनी या निर्णयाचे स्वागत करताना सांगितले की, ''महापालिका आयुक्तांची ही संकल्पना अत्यंत कौतुकास्पद आहे. शहर स्वच्छ राहिल्यास त्याचा फायदा व्यापाऱ्यांनाच होतो. कचरा वर्गीकरण करणे ही आपलीही जबाबदारी आहे आणि मनपाच्या या मोहिमेला शहरातील सर्व व्यापारी पूर्ण सहकार्य करतील; मात्र पथकांनी प्रामाणिक व्यापाऱ्यांना नाहक त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी, हीच आमची अपेक्षा आहे.'' एकंदरीत, मनपाच्या या धडक मोहिमेमुळे व्यापारी क्षेत्रातील कचऱ्याची वर्षानुवर्षांची समस्या कायमची सुटण्यास मदत होणार असून, स्वच्छ आणि सुंदर छत्रपती संभाजीनगर हे स्वप्न आता लवकरच प्रत्यक्षात येईल अशी चिन्हे दिसत आहेत.

## थेट संवादावर भर

महानगरपालिका आयुक्तांनी आपल्या सकाळच्या मॉर्निंग वॉकचे रूपांतर एका प्रभावी शहर पाहणी मोहिमेत केले असून, याद्वारे स्वच्छता व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी केली जात आहे. या मोहिमेदरम्यान कामात हलगर्जीपणा करणाऱ्या आणि अनुपस्थित राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर तात्काळ दंडात्मक कारवाईच्या सूचना दिल्या जात आहेत. मात्र, हे विशेष पथक केवळ कारवाईपुरते मर्यादित नसून, शहरातील प्रमुख व्यापारी भागांमध्ये दुकानदार आणि व्यापाऱ्यांशी थेट संवाद साधून कचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती करत आहे. कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, वेळेवर संकलन आणि व्यापाऱ्यांच्या व्यावहारिक अडचणी जाणून घेऊन त्यावर प्रभावी उपाययोजना करण्यावर आयुक्तांचा भर आहे. थोडक्यात, दंडात्मक कारवाईचा धाक आणि संवाद व लोकसहभागाची जोड देत शहर स्वच्छ, सुंदर व शिस्तबद्ध ठेवण्याचा हा उपक्रम अत्यंत प्रभावी ठरत आहे.

# गुंड बाबा फर्जंदच्या घरातून जिवंत काडतुसे, ५ कोटी २६ लाखांची रोख रक्कम जप्त

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- कामगार युनियन आणि जमिनीच्या देवाणघेवाणीतून गुंडगिरी करणाऱ्या मृत बाबा फर्जंद याच्या मिटमिटा भागातील घरामध्ये गुन्हे शाखेने मध्यरात्री कारवाई करत मोठा शस्त्रसाठा, जिवंत काडतुसे, काही कोटींची रोख रक्कम व १५१.३३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जप्त केले. या संदर्भातील माहिती पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी शनिवारी दुपारी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.



या कारवाईच्या माहितीची कुणकुण लागली होती. परंतु याबाबत कमालीची गुप्तता पाळण्यात आली होती. छावणी पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असलेल्या मिटमिटा या भागात केलेल्या कारवाईची संपूर्ण प्रक्रिया होईपर्यंत छावणी पोलिसांनाही कुठलीही खबर लागू देण्यात आली नव्हती. बाबा फरजान असे नाव असलेल्या कथित गुंडाच्या सुमारे एक एकरच्या परिसरातील बंगल्यामध्ये मध्यरात्री गुन्हे शाखेच्या पोलिसांनी छापा मारला. या छाप्यामध्ये अधिकतर कर्मचारी हे नवखे किंवा नेहमीच्या पथकातील नव्हते, अशी माहिती समोर आली.

या छाप्यामध्ये पाच कोटी २६ लाख २९ हजार ५६० रुपयांची रोख रक्कम आढळून आली असून हे पैसे मोजण्यासाठी पोलिसांना दहा मशीनचा वापर करावा लागल्याचे सांगण्यात येत आहे. याशिवाय वेगवेगळ्या प्रकारच्या बंदुकांमध्ये वापरण्यात येणाऱ्या तब्बल ६३२ एवढ्या संख्येतील जिवंत काडतूस सापडण्यात आले. सोबतच २१ हत्यारे आढळून आली असून त्यातील ४ शस्त्रांचा परवाना मृत बाबा फर्जंद याच्या नावे असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या घरामध्ये मद्यसाठाही आढळून आला असून पोलिसांनी ४५ बाटल्या जप्त केल्या आहेत. सोन्याचे १५१.३३ ग्रॅम एवढे तब्बल सोन्याचे दागिने आढळून आले असून त्याची किंमत पोलिसांनी २१ लाख नोंद करण्यात आली आहे.

या प्रकरणी पोलीस कर्मचारी योगेश डोंगर नवसारे यांच्या फिर्यादीवरून छावणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस आयुक्तालयातील अनेक अधिकारी, कर्मचाऱ्यांचा फौजफाटा मिटमिटा भागातील मुख्य रस्त्यापासून सुमारे ५०० मीटर अंतरावर असलेल्या घटनास्थळी रात्रभर होता. विशेष म्हणजे ही कारवाई शुक्रवारी सकाळपासून सुरू होती. या घटनेबाबत कमालीची गोपनियता राखण्यात आली. संबंधित बंगल्यामध्ये एकूण ५ कोटी ६३ लाख ३७ हजार ९९४ एवढा मुद्देमाल आढळून आला. ज्यामध्ये शस्त्रास्त्रात १७ चाकू, गुप्ती ३, २ पिस्टल, ४ रायफल्स, ४५ मद्याच्या बाटल्या, २१ लाख ३४ हजार ३५० सोन्याचे दागिने, ८ लाख ९ हजार २४८ रुपये किमतीचे ३.९ किलो वजनाच्या दागिन्यांचा समावेश आहे.

# मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कामकाज वेळेत पूर्ण करा-जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी.



छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण करण्यासाठी वैजापूर विधानसभा मतदारसंघात सुरू असलेले घरोघरी सर्वेक्षण मोहिमेचे कामकाज वेळेत पूर्ण करा, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारीविनय गौडा जी. सी. यांनीवैजापूर येथे काल (दि. १०)दिले.

या दौऱ्यात त्यांनी तालुक्यातील शिवूर आणि सफीयाबाद वाडी येथील मतदान केंद्रांना भेट देऊन मतदान केंद्रस्तरीय अधिकारी तसेच पर्यवेक्षकांच्या कामकाजाची पाहणी केली. त्यानंतर पंचायत समिती वैजापूर येथे आढावा बैठक घेण्यात आली. ही माहिती मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जन्हाड यांनी दिली.

बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी मतदार यादी पुनरीक्षणाचे काम अत्यंत महत्त्वाचे असून ते राष्ट्रीय कर्तव्य असल्याचे सांगितले. मतदारसंघातील प्रत्येक यादीभागाचे काम विहित मुदतीत आणि अत्यंत अचूकपणे पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. कामात कोणतीही दिरंगाई किंवा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नसल्याचा इशाराही त्यांनी दिला.

मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचे घरोघरी सर्वेक्षण आणि फॉर्मचे काम शंभर टक्के पूर्ण होईल, अशा उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनी रोजी प्रशस्तीपत्र देऊन जाहीर सत्कार करण्यात येणार आहे, असे जिल्हाधिकारी गौडा यांनी जाहीर केले. दुसरीकडे, निवडणूक कामात निष्काळजीपणा करणाऱ्या किंवा वरिष्ठांच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला. शासकीय कर्मचारी यांनी कामात टाळाटाळ केली, विनाकारण अनुपस्थित राहिले किंवा आदेशाचे पालन केले नाही, तर लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० च्या कलम ३२(१) अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले.

# पाणी पुरवठा योजनेतील तांत्रिक दुरुस्त्या दुर केल्या शिवाय पाणी वेळेवर मिळण्याचे स्वप्न दूरच -राजेंद्र दाते पाटील

## मराठवाडा पाणी परिषदेतर्फे शहराच्या पाणी प्रश्नावर जलमंथन

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- पाणी पुरवठा योजनेतील तांत्रिक दुरुस्त्या दुर केल्याशिवाय संभाजीनगर वासीयांचे पाणी वेळेवर मिळण्याचे स्वप्न दूरच आहे असे प्रतिपादन जेष्ठ जल अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी मराठवाडा पाणी परिषदेतर्फे ग्राम विकास भवन एन २ सिडको येथे आयोजित '' जलमंथन '' उपक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ''छत्रपती संभाजीनगर पाणीपुरवठा योजना व सद्यस्थिती '' या विषयावर बोलत होते .

या प्रसंगी परिषदेचे अध्यक्ष नरहरी शिवपुरे,माजी अधीक्षक अभियंता डॉ. जयसिंग हिरे, दादासाहेब शिंदे, जलधोरण विषयाचे नियोजक रामचंद्र पिल्दे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलतांना जेष्ठ जल अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील म्हणाले की, छत्रपती संभाजीनगरकर अनेक वर्षा पासून वेळेवर व दररोज पिण्याच्या पाण्याच्या प्रतीक्षेत आहेत. परंतु वस्तुस्थिती वेगळी आहे .प्रस्तावित ५६पाण्याच्या टाक्या बांधकामअद्याप अपूर्ण आहेत. २५०० मी.मी व्यासाची जल वाहिनी अपूर्ण असुन ९०० मी. मी.व्यासाची जलवाहिनी -मुख्य जलवाहिनीची हायड्रोलिक टेस्टिंग करणे अत्यावश्यक असुन शहरातील सामान्य ग्राहकांच्या पर्यंत मोठ्या प्रमाणात जलवाहिनीचे काम बाकी आहे. शहराची गरजसाधारणतः ३७५ ते ४०० द.घ.ली. पाण्याची असताना सद्य स्थितीत फक्त १५०ते १७० द.घ.ली पाणी उपलब्ध होत असुन या योजनेची सविस्तर तांत्रिक माहिती जलमंथन परिषदेत पहिल्यांदाच अत्यन्त अभ्यासु पद्धतीने डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी विषद करतांना नमुद केले की,पाणी साठवणूक क्षमता आणि ग्राहकांपर्यंत पाईप लाईन अंथरलेली नसल्यामुळे पाणी वाढवून सुद्धा परिणामी नागरिकांना आठ दिवसाला एकदा ते ही अनियमित वेळेत पाणी पुरवठा होतो आहे.अशा परिस्थितीत दररोज वेळेवर व पुरेसे पाणी मिळेल हे दिवा स्वप्नच असल्याचे नमुद त्यांनी केले.

याप्रसंगी डॉ. जयसिंग हिरे यांनी काही महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या. शहराची पाणीपुरवठा योजना वेळेत पूर्ण करून छत्रपती संभाजीनगर शहरवासीयांना लवकरात लवकर पाणी उपलब्ध करून द्यावे याकरिता लवकरच जलमंथन ग्रुप तर्फे महापालिका आयुक्तांना याबाबतचे निवेदन देण्याचे ठरले.

प्रस्ताविकात परिषदेचे अध्यक्ष नरहरी शिवपुरे यांनी आशिया खंडात वेगाने वाढणाऱ्या व औद्योगिकक्षेत्रात प्रगतीपथावर असलेल्या ऐतिहासिक शहर छत्रपती संभाजीनगरवासी यांना वेळेवर व दररोज पाणीपुरवठा होण्याची अत्यंत आवश्यकता आहे. यासाठी समाजातील बुद्धीवादी,जल अभ्यासक व जागरूक नागरिकांनी पाणी प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे याबाबत माहिती दिली.या कार्यक्रमात सिंदोन गावचे प्रगतिशील शेतकरी दादासाहेब शिंदे यांना वसंतराव नाईक संशोधन व ग्रामीण विकास प्रतिष्ठानचा '' फुलशेती '' पुरस्कार'' मिळाल्याबाबत त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

जलमंथन परिषदेत मराठवाड्यातील जल प्रश्नांचा अभ्यास, वैज्ञानिक दृष्टि कोनातून उपाययोजना आणि लोकसह भागातून जल धोरणावर विधायक चर्चा घडवून आणण्यात येते. याप्रसंगी विद्यापीठातील जी. एम. एन .आय .आर डी चे डॉ.राहुल महामुनी,जयप्रकाश बागडे ,शिवाजी घुगे,सतीश वानखेडे,भारती खरटमल, अशोक कोळी यांचे सह जलक्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. या जलमंथन परिषदेचा कार्यक्रम यशस्वी करण्या करिता अर्चना पवार ,निवृत्ती घोडके ,योगिता शिंदे यांनी परिश्रम घेतले.

# श्री भद्रा मारोती मंदिरात शिवसेनेचे रामरक्षा आंदोलन

## महामंडलेश्वर शांतीगिरी महाराज यांची भेट घेऊन दिले निवेदन

खुलताबाद दि.११ (प्रतिनिधी)- अयोध्येतील राम मंदिरात कोट्यावधी रुपायांचा अपहार आणि देणगी लुटप्रकरणी शिवसेनेचे राज्यव्यापी रामरक्षा आंदोलन सुरु आहे. यादरम्यान शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांच्या नेतृत्वाखील शनिवार, ११ रोजी जिल्ह्याचे ग्रामदैवत श्री भद्रा मारोती मंदिर, रत्नपूर येथे महाआरती करण्यात आली. यावेळी सभागृहात श्रीराम मंदिरात रामरक्षा, मारोती स्तोत्र, हनुमान चालिसाचे पठण करण्यात आले. भाविकांनी श्रद्धेने दान केलेल्या वस्तू व आर्थिक मदतीत मोठा अपहार झाला. सर्व आरोपीविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे. यावेळी वेरूळ येथे महामंडलेश्वर शांतीगिरी महाराज यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले.



भद्रा मारोती मंदिरात महाआरतीस संस्थानचे अध्यक्ष मिठ्ठू पाटील बारगळ, शिवसेना उपनेते सुभाष पाटील शिवसेना सहसंपर्कप्रमुख विजयराव साळवे, शिक्षक सेनेचे पद्माकर इंगळे, माजी महापौर सुदाम सोनवणे, युवासेना उपसचिव ऋषिकेश खैरे, उपजिल्हाप्रमुख श्रीरंग आमटेपाटील, विधानसा संघटक गिरीष चपळगावकर, शहरप्रमुख दिग्विजय शेरखाने, ज्ञानेश्वर डांगे, रत्नपूर शिवसेना तालुकाप्रमुख राजू वरकड, विधानसभा संघटक गणेश आधाने, शहर प्रमुख मुकेश मालोदे, युवासेना तालुका युवाअधिकारी सुशील दुधारे, ब्रदीनाथ वाकळे, नानासाहेब चव्हाण, विजय चव्हाण, ओम खोसरे, नागेश कायस्थ, जयश्री साळुंके, नंदू साळुंके, काकासाहेब वाकळे, प्रभाकर वाकळे, शिवाजी वाकळे, सतीश चव्हाण, गोकूळ गवळी, उपशहरप्रमुख संदेश कवडे, राहुल सोनवणे, प्रतिक अकुंश, गौरव पुरंदरे, देविदास रत्नपारखी, सुरेश फसाटे, विजय सुर्यवंशी, युवासेनेचे रामेश्वर कोरडे, मंदार पाठक, संदीप गुरूजी, बंडू जोशी, बाळु जोशी, महिला आघाडीच्या सुनिता आऊलवार, सुनिता देव, अनिता मंत्री, दुर्गा भाटी, आशा दातार, मिरा फसाटे, सुकन्या भोसले, मिरा देशपांडे, अरुणा भाटी, रेणुका जोशी, सुनंदा खरात. नलीनी बाहेती, रेखा शाह, राजश्री पोफळे, सारीका शर्मा, सीमा गवळी, रंजना आहेर आदीसह शिवसेना, युवासेना, महिला आघाडी पदाधिकारी उपस्थित होते.

शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी साधूसंताची भेट घेऊन रामभक्तांच्या भावना मांडल्या आहे. यामध्ये स्वामी नरेंद्राचार्य महाराज, महंत रामगिरी महाराज, महामंडलेश्वर शांतीगिरी महाराज यांनी निवेदन दिले. रविवार, १२ रोजी श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग, दिंडोरी जि. नाशिक येथे गुरूमाऊली अण्णासाहेब मोरे यांची भेट घेऊन निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी दिली.

# जिल्हाधिकारी गौडा यांचा उद्योजकांशी संवाद; औद्योगिक विकास, कौशल्य, पायाभूत सुविधांवर भर देण्याचे आश्वासन

छत्रपती संभाजीनगर दि.११ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर येथे चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर (सीएमआयए) द्वारे आयोजित उद्योग-प्रशासन संवाद कार्यक्रमात जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी उद्योजकांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील औद्योगिक विकास, कौशल्य विकास, पायाभूत सुविधा आणि कनेक्टिव्हिटीवर भर देण्याचे आश्वासन दिले. उद्योगांशी समन्वय साधण्यासाठी दर तीन महिन्यांनी अशा प्रकारच्या बैठका आयोजित केल्या जातील, अशी घोषणाही त्यांनी केली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सीएमआयएचे अध्यक्ष अथर्वेशराज नंदावत यांनी उद्योग आणि प्रशासन यांच्यात सातत्यपूर्ण संवाद आवश्यक असल्याचे सांगितले. छत्रपती संभाजीनगर हे देशातील महत्त्वाचे उत्पादन आणि ईव्ही उद्योग केंद्र म्हणून वेगाने विकसित होत असून, प्रशासनाच्या सहकार्याने या विकासाला अधिक गती मिळेल, असे ते म्हणाले.

विकसित भारत आणि विकसित महाराष्ट्रासाठी विकसित संभाजीनगर महत्त्वाचे आहे. जिल्ह्याचे सकल जिल्हा अंतर्गत उत्पादन दुप्पट करण्यात उद्योग क्षेत्राची भूमिका निर्णायक राहील. मोठ्या औद्योगिक गुंतवणुकीमुळे जिल्ह्याच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल. निती आयोग आणि महाराष्ट्र शासनाच्या मित्रा उपक्रमांतर्गत संभाजीनगर ग्रोथ हब विकसित करण्याचे नियोजन सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले.

आपल्या भाषणात जिल्हाधिकारी गौडा यांनी कौशल्य विकास, पीएम सेतू योजना, विमानतळ विस्तार, ऑरिक परिसराची कनेक्टिव्हिटी आणि प्रस्तावित रिंग रोड यावर सविस्तर माहिती दिली. उद्योगांच्या गरजेनुसार कौशल्य विकासावर भर देत प्रशासन उद्योगांना सर्वतोपरी सहकार्य करेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

सीएमआयएचे मानद सचिव अजिंक्य सावे यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. उद्योग विकास, धोरणात्मक पाठपुरावा, कौशल्य विकास, पायाभूत सुविधा, निर्यात प्रोत्साहन आणि उद्योग-अनुकूल वातावरण निर्मितीसाठी सीएमआयए सातत्याने कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले.

संवाद सत्रात ५० हून अधिक उद्योजकांनी पायाभूत सुविधा, कनेक्टिव्हिटी, कौशल्य विकास आणि उद्योग क्षेत्रातील विविध समस्यांवर सूचना मांडल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित विषयांवर आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. ऋषिकेश जाजू यांनी सूत्रसंचालन केले, तर आनंद मोदानी यांनी आभार मानले.

दैनिक लोकविजय
**CHANGE OF NAME**
I HAVE CHANGED MY NAME FROM
**OLD NAME** - Shaheen Begam
**TO NEW NAME** - Shaheen Begum and complete name as Shaheen Begum Suhail Ahmed Khan

दैनिक लोकविजय
**CHANGE OF NAME**
I HAVE CHANGED MY NAME FROM
**OLD NAME** - Ahmed Suhel Khan
TO **NEW NAME** - Suhail Ahmed Khan and complete name as Suhail Ahmed Mohammed Mustafa Khan